www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक
# लोकरक्षणाय
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ



■ मोघरपाडा कारशेड डेपो मेट्रो मार्गिका ४.४अ,...
पान ३ वर....



■ आदिवासींच्या प्रश्नांवर राजकारणापलीकडे...
पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक २२७ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, शुक्रवार, २४ जानेवारी २०२५ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## मंत्री भरत गोगावलेंचे सुनिल तटकरेंना खुले आव्हान

जो स्वतःच्या भावाचा होऊ शकला नाही, तो तुमचा आमचा काय होणार, मंत्री भरत गोगावलेंची सुनिल तटकरे यांच्यावर जहरी टीका

पालीत शिंदे शिवसेनेचे मंत्री गोगावले, आ. दळवी, आ. थोरवे तिन्ही आमदारांची सुनिल तटकरे यांच्यावर घणाघाती टीका



● रायगड, फरीद डावरे

रायगड जिल्ह्यात शिवसेना (शिंदे गट), भाजप, राष्ट्रवादी (अजित पवार गट) व अन्य मित्र पक्ष यांच्यात महायुती असली तरी काही दिवसापासून याच महायुती मध्ये मिठाचा खडा पडला असल्याचे चित्र दिसून येत आहे. पालकमंत्री पदावरून पेटलेला वाद आता क्षमता क्षमत नसल्याचे दिसून येते आहे. शिवसेना शिंदे गटाचे मंत्री भरत गोगावले, आ.महेंद्र दळवी, आ. महेंद्र थोरवे यांनी आता उघडपणे खासदार सुनिल तटकरे यांच्यावर शाब्दिक प्रहार करायला सुरुवात केली आहे. त्यामुळे टोला प्रतिटोला अशी फटकेबाजी रायगडच्या राजकारणात सुरू झाली आहे. अलिबाग येथील पत्रकार परिषदेत सुनील तटकरे यांनी आमच्या विरोधात कोण जातं आणि त्यांचं पुढे काय होत हे माहीत आहे अस विधान केल होत, हेच विधान पकडून मंत्री भरत गोगावले यांनी गुरुवारी झालेल्या पाली उन्हेरे च्या राज रिसोर्ट येथील भव्य सत्कार व पक्ष प्रवेश सोहळ्यात जोरदार प्रत्युत्तर दिले आहे.

पान २ वर

## दरडप्रवण गावांचे पुनर्वसन धोरणात सुधारणा करण्यासाठी अभिप्राय मागवावेत - मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील

● मुंबई, विशाल पाटील



दरडप्रवण गावांच्या पूनर्वसनासाठीच्या अस्तित्वात असलेल्या धोरणात सुधारणा करण्यासाठी सूचना व अभिप्राय मागवण्याच्या सूचना मदत व पूनर्वसन मंत्री मकरंद जाधव – पाटील यांनी दिल्या. याबाबत शासनाचे आक्टोबर २०२२ मध्ये धोरण ठरवण्यात आले आहे.

मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांच्या उपस्थितीत दरडप्रवण गावांचे पुनर्वसनाबाबत बैठक झाली. बैठकीस आपत्ती व्यवस्थापनचे संचालक सतीशकुमार खडके, सह सचिव संजय इंगळे, अवर सचिव प्रितमकुमार जावळे यांच्यासह संबधित अधिकारी उपस्थित होते. अतिवृष्टी, पूर, भूस्खलन किंवा जमिनीला मोठमोठ्या भेगा पडणे, डोंगर खचणे किंवा दरडी कोसळणे इ. कारणांमुळे बाधित तसेच आपत्तीप्रवण गावांचे पुनर्वसन व नागरी सुविधा पुरविणे, पुनर्वसनासाठी पात्र लाभार्थ्यांचे निकष या धोरणात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. तसेच पुनर्वसित ठिकाणी १२ नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत धोरणात तरतूद करण्यात आली आहे. मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव पाटील म्हणाले की, या धोरणाची अंमलबजावणी करताना क्षेत्रीय स्तरावर काही समस्या निर्माण होऊ नयेत यासाठी तज्ज्ञ आणि संबंधित विभागांच्या सल्ल्यानुसार, या धोरणात आणखी काही सुधारणा होऊ शकतात. त्यामुळे या धोरणात सुधारणा करणे व आणखी काही बाबींचा समावेश करणेबाबत क्षेत्रीय स्तरावरून सूचना घेणे आवश्यक आहे.

## निकृष्ट बांधकामामुळे पूल खचला, गडकरींवर नामुष्कीची वेळ!



● नागपूर, नितीन देवळेकर :

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या पुढाकाराने उभारण्यात आलेला बुटीबोरी उड्डाणपूल निकृष्ट बांधकामामुळे खचल्याचा आरोप होत असून सरकारवर नामुष्कीचे वेळ आली आहे. विशेष म्हणजे, कंत्राटदाराचे दुर्लक्ष आणि मर्यादेपेक्षा अधिक माल वाहून नेणाऱ्या ट्रकचालकावर ठपका ठेवून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने या प्रकरणात आपले हात झटकले आहेत.

पान २ वर

## भिवंडीत ‘मिनी बांगलादेश’- किती लोकांना मिळाला जन्माचा दाखला?

● ठाणे, रोहित जैसवार :




अभिनेता सैफ अली खान याच्या घरात घुसून चोरी करणाऱ्या आणि हल्ला करणाऱ्या आरोपीला ठाण्यातील हिरानंदानी इस्टेट परिसरातून पकडण्यात पोलिसांना यश आलय. अटक करण्यात आलेला आरोपी बांगलादेशी नागरिक असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केल्यानं बांगलादेशी नागरिकांविरोधातील कारवाई तीव्र करण्याची मागणी वाढीस लागली आहे. याच प्रकरणावरुन भाजपा नेते किरीट सोमैया आक्रमक झाल्याचं बघायला मिळतय. मालेगाव येथे बांगलादेशी आणि रोहिंग्या नागरिकांना बनावट जन्मदाखले देऊन त्यांना आधारकार्ड देऊन त्यांचा समावेश मतदार यादीत केल्याचा आरोप किरीट सोमैया यांनी केला होता. त्यानंतर राज्यसरकारनं या प्रकरणाचा तपास करण्यासाठी एसआयटीची घोषणा केली होती. आता भिवंडीत देखील मोठ्या प्रमाणात बांगलादेशी नागरिक वास्तव्यास असल्याचा दावा किरीट सोमैयांनी केलाय.

पान २ वर




## अमित शाह यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर, ड्रोन उड्डाणास प्रतिबंध

● नाशिक, सचिन कदम :

केंद्रीय गृह व सहकारमंत्री अमित शहा हे शुक्रवारी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात ते त्र्यंबकेश्वर व मालेगाव येथे भेट देणार आहेत. शहा यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून जिल्ह्यात बुधवारी रात्रीपासून ते शुक्रवारी रात्रीपर्यंत ड्रोन उड्डाणास प्रतिबंध घालण्यात आहे. शहा यांच्या सुधारित दौऱ्यानुसार शुक्रवारी दुपारी साडेबारा वाजता ते त्र्यंबकेश्वर मंदिरात दर्शन घेऊन पूजा करतील. नंतर हेलिकॉप्टरने ते मालेगाव तालुक्यातील अजंग येथे व्यंकटेश्वरा सहकारी वीज आणि कृषी प्रक्रिया लिमिटेडतर्फे आयोजित सहकार परिषद आणि विविध कार्यक्रमांस उपस्थित राहणार आहेत. या कालावधीत कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने जिल्ह्यात ना उड्डाण क्षेत्र अर्थात ‘नो ड्रोन फ्लाय झोन’ घोषित करण्यात आला आहे. या बाबतचे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी राजेंद्र वाघ यांनी दिले.

पान २ वर

## १०० दिवस कृती आराखडा आढावा बैठक संपन्न

### जनतेच्या कामाला सर्वोच्च प्राधान्य द्या - पालक सचिव डॉ. सोनिया सेठी

● पालघर, सुचिता सोनावणे :




कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये येणाऱ्या नागरिकांच्या अडचणी जाणून घेऊन त्या लवकरात लवकर निकाली काढून शासकीय अधिकार आणि कर्मचारी यांनी जनतेच्या कामाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. असे निर्देश पालक सचिव तथा अप्पर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन ) डॉ. सोनिया सेठी यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालय येथे १०० दिवस कृती आराखड्यासंदर्भात डॉ. सेठी यांनी आढावा बैठक घेतली. बैठकीला जिल्हाधिकारी गोविंद बोडके, पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अप्पर जिल्हाधिकारी भाऊसाहेब फटांगरे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे, निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे, उपजिल्हाधिकारी विजया जाधव, महेश सागर, तुषार माळी तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

आढावा घेतल्यानंतर पालक सचिव डॉ. सेठी म्हणाल्या, सर्वांनी चांगले सादरीकरण केले आहे. जिल्हा प्रशासनाची टीम चांगलं काम करत आहे. त्याबद्दल तुमच्या सर्वांचे अभिनंदन. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या या कृती आराखड्याचा गुड गव्हर्नन्ससाठी प्राधान्याने अंमलबजावणी करावी. सर्वसामान्य जनतेचे जीवन सुसाह्य करण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करावे. सकारात्मतक विचार करुन कार्यालयात येणाऱ्या जनतेची कामे प्राधान्याने करावी कार्यालयातील वातावरण आनंदी, प्रसन्न असले पाहिजे, असेही त्या म्हणाल्या.

जिल्हाधिकारी गोविंद बोडके, पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील तसेच विविध विभागप्रमुखांनी ७ कलमी कृती कार्यक्रमावर आधारित १०० दिवस कृती आराखडा याविषयी संगणकीय सादरीकरण केले.

आढावा बैठकीपूर्वी जिल्हाधिकारी बोडके यांनी पुष्पगुच्छ देऊन पालक सचिव डॉ.सेठी यांचे स्वागत केले.

## नालासोपाऱ्यातील अनधिकृत इमारतीवर कारवाईला सुरुवात

● नालासोपारा, सतीश सोनावणे :



नालासोपारा मधील ४१ अनधिकृत इमारतींमधील उर्वरित ३४ इमारतींवर गुरूवार सकाळ पासून कारवाईला सुरवात करण्यात आली. यावेळी पोलिसांचा मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. नालासोपारा पूर्वेच्या अग्रवाल नगरी येथील आरक्षित जागेवर ४१ अनधिकृत इमारती बांधण्यात आल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाने या इमारतींवर कारवाईचे आदेश नोव्हेंबर महिन्यात कारवाईला सुरुवात करण्यात आली होती. पहिल्या दिवशी ७ अतिधोकादायक इमारती निष्काषित करण्यात आल्या होत्या. त्यानंतर त्या इमारतींचा राडारोडा उचलण्याचे काम काही दिवस सुरू होते. त्यातच ३४ इमारतींमधील रहिवाशांनी घरे खाली न केल्याने कारवाई थंडावली होती. ही कारवाई ३१ डिसेंबर पर्यंत करणे अपेक्षित होते. मात्र रहिवाशांच्या विरोधामुळे विलंब झाला होता. परंतु आता पालिकेने पुन्हा कारवाईला सुरवात केली आहे. २३, २४ आणि २७, २८ जानेवारी असे ४ दिवसात कारवाई होणार आहे. या चार दिवसांत कारवाईसाठी पोलिसांकडून पालिकेला ४०० पोलिसांचा बंदोबस्त मिळाला आहे. पालिकेने येथील २ हजारांहून अधिक कुटुंबियांना घरे खाली करण्यासाठी पालिकेने रहिवाशांना नोटीसा पाठवल्या होत्या. गुरुवारी सकाळी पोलीस बंदोबस्तात कारवाईला सर्वात झाली. उत्खनकच्या सहाय्याने इमारती पाडण्यात येत आहेत.

पान २ वर

## हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान लोकचळवळ व्हावी - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

● मुंबई, विशाल कारंडे :



राज्यातील सर्व एस टी बस स्थानकांमध्ये राबविण्यात येणाऱ्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियानामध्ये एस.टी. कर्मचाऱ्यांसोबतच लोकांनीही सहभागी व्हावे आणि ती एक लोकचळवळ व्हावी, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले. कुर्ला बसस्थानक येथे या अभियानाच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते.स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त आज परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याहस्ते कुर्ला नेहरूनगर बसस्थानकावर "हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियानाच्या बोधचिन्हाचे अनावरण करून या अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. मंत्री सरनाईक म्हणाले की, आपण आपल्या घरात ज्या पद्धतीने स्वच्छता ठेवतो त्याप्रमाणेच आपण जिथे काम करतो, तेथे देखील आपले घर समजून त्या कार्यालयाची, त्या बसस्थानकाची स्वच्छता ठेवणे हे आपले कर्तव्य आहे. भविष्यात स्वच्छ, सुंदर, सुशोभित बसस्थानके नक्कीच प्रवाशांना आकर्षित करतील. अतिशय प्रसन्न वातावरणामध्ये बस प्रवास करण्याचा आनंद त्यांना घेता येईल. अर्थात स्वच्छता हा एक "संस्कार" आहे, तो जसा एसटी कर्मचाऱ्यांनी अंगिकारणे महत्वाचे आहे. तसेच प्रवाशांनीही तो आपल्या आचरणात आणला पाहिजे. बसस्थानक ही सार्वजनिक जागा आहे. तिथे स्वच्छता ठेवणे ही एसटी कर्मचारी आणि प्रवासी या दोघांची संयुक्त जबाबदारी आहे. स्वच्छतेबाबत परदेशात जेवढी सजगता आणि जागरूकता आहे, तेवढी आपल्या देशात नाही, ही वस्तुस्थिती आहे. परंतु आपण स्वच्छतेबाबत लोकांमध्ये जनजागृती करून आपली बस स्थानके स्वच्छ आणि सुंदर करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहणे गरजेचे आहे. या स्पर्धात्मक अभियानातून एसटीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये आपले बसस्थानक स्वच्छ, सुंदर व टापटीप ठेवण्यासाठी प्रयत्न व्हावेत. या माध्यमातून भविष्यात चांगली सुंदर बसस्थानक प्रवाशांच्या सेवेसाठी उपलब्ध असतील, अशी आशाही मंत्री श्री. सरनाईक यांनी व्यक्त केली. एसटी महामंडळाचे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी गिरीश देशमुख यांनी प्रास्ताविक केले, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ माधव कुसेकर यांनी अभियानाची रुपरेषा मांडली, तर उपमहाव्यवस्थापक जयेश बामणे यांनी आभार मानले.

## मोरा-मुंबई रो रो सेवा मार्च २०२६ पर्यंत कार्यान्वित



● उरण, भावना जैन :

मोरा ते मुंबई व दरम्यान रो रो सेवेसाठी जेट्टी उभारण्याचे काम २०१८ सालापासून रखडले आहे. त्यानंतर जेट्टीचे काम अनेक महिने बंद होते. या कामाला पुन्हा एकदा सुरुवात झाली असून मार्च २०२६ पर्यंत हे काम पूर्ण होणार असल्याचा दावा महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी केला आहे. त्यामुळे या नव्या मुहूर्तावर तरी ही सेवा सुरू का असा सवाल केला जात आहे.

विलंबामुळे या जलमार्गाच्या कामाच्या खर्चात वाढ झाली आहे. यातील रेवस जेट्टीच्या कामात पाच कोटींच्या खर्चात वाढ झाली आहे. महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाच्या माध्यमातून या जेट्टीचे काम करण्यात येत आहे. या जेट्टीचे काम पूर्ण होण्यासाठी आणखी काही महिने लागण्याची शक्यता आहे. मोरा ते मुंबईतील भाऊचा धक्का या रो रो मार्गावरील भाऊचा धक्का ही जेट्टी कार्यान्वित झाली आहे.

मात्र मोरा जेट्टीचे काम सहा वर्षांपासून रखडले आहे. हे काम रखल्याने ५० कोटींच्या कामाची रक्कम ७५ कोटींवर पोहचली आहे. तरीही जेट्टीचे काम अपूर्णच असून जेट्टीपर्यंत जाण्यासाठी मार्गही होऊ शकलेला नाही. उरण हा समुद्र आणि खाडी मार्गाने मुंबई आणि अलिबाग यांना जोडता यावा यासाठी स्वातंत्र्यपूर्व काळापासून जलसेवा सुरू आहे. मात्र या मार्गाने वाहन घेऊन प्रवास करता यावा याकरिता रो रो सेवा सुरू करण्याचा मानस आहे. हे काम वारंवार बंद होऊन रखडले आहे. त्यामुळे हे काम पूर्ण होणार का असा सवाल आता या मार्गावरील प्रवासी करू लागले आहेत.

पान २ वर

## संपादकीय

# आली रे आली .. कठोर निर्णयाची वेळ आली

संतोष देशमुख यांच्या भयानक हत्येने बीड जिल्ह्यातील परिस्थितीला एक नवा वळण दिला आहे. परळीमधील मस्साजोग गावच्या सरपंच संतोष देशमुख यांची हत्या केल्यामुळे बीडमधील विविध प्रकार उघडकीस आले आहेत. ही हत्या फक्त एक उदाहरण ठरली, ज्याने बीडमध्ये चलणाऱ्या वाळू माफिया, राख माफिया, बेकायदेशीर शस्त्रांचा वापर, आणि त्यांचा एकमेकांविरोधात होणारा दहशतपूर्ण वापर उघड केला.

या सगळ्याचा केंद्रबिंदू ठरलेला होता वाल्मिक कराड, जो या घटनेनंतर फरार झाला होता. त्याची गायब होण्याची वेळ आणि त्याच्या अगदी जवळ असलेल्या लोकांच्या दबावामुळे राज्यातील महायुती सरकारच्या मंत्री, विशेषतः अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर आरोप सुरू झाले. राज्यातील विरोधकांनी धनंजय मुंडे यांना घेरले होते, आणि त्यांचा संबंध या प्रकरणाशी जोडला जात होता.

त्यावेळी विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात मंत्री मुंडे हजर नव्हते, आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मुंबई दौऱ्यातही ते अनुपस्थित होते. अशा स्थितीत, मंत्री असलेल्या एका व्यक्तीला पंतप्रधानांच्या मार्गदर्शन सत्रात गैरहजर राहणं आश्चर्यचकित करणं होतं. भाजपचे आमदार सुरेश धस यांनी या प्रकरणाला अधिक गंभीर बनवले. त्यांनी वाल्मिक कराड आणि धनंजय मुंडे यांचा खोडसाळपणे उल्लेख केला, आणि त्यांची नावे बदनाम करण्याचा प्रयत्न केला.

धनंजय मुंडे यांना मंत्रीपदाच्या दरम्यान हे दबाव सहन करावे लागले. लोकांच्या प्रतिक्रियांमुळे, विशेषतः अंजली दमानिया यांची मागणी, त्यांना मंत्रीपदावरून पायउतार होण्याची गरज असल्याचे बोलले जाऊ लागले. परंतु, काहीच काळाने वाल्मिक कराड पोलीसांना शरण आला, आणि त्याचे कारनामे अधिक उघडकीस आले. या सगळ्या प्रकरणामुळे बीड जिल्ह्यातील राजकीय वातावरण अधिक तणावपूर्ण बनले.

संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर, ज्या दबावात महायुती सरकार होते, त्याने पालकमंत्रीपदाच्या विभागाच्या निवडीला महत्त्व दिलं. दरम्यान, पालकमंत्रीपदाची घोषणा झाली, पण धनंजय मुंडे यांना त्या विभागाचा मंत्रिपद दिलं गेलं नाही, आणि या निर्णयामुळे त्यांच्या भविष्यातील राजकीय भूमिका स्पष्ट होण्याची शक्यता दिसली. वाल्मिक कराड हा मुंडे कुटुंबीयांचा एकेकाळचा विश्वासू व्यक्ती असल्यामुळे, त्यांचा संबंध हा सरकारच्या अंधारलेल्या बाजूस कसा जुळलेला आहे, हे स्पष्ट झालं.

संतोष देशमुख यांच्या हत्येने आणि वाल्मिक कराडच्या कथित संबंधांनी महायुती सरकारला मोठ्या समस्यांचा सामना करावा लागला. विरोधकांनी राज्यातील गुंडगिरी आणि माफिया राजाला लक्ष्य केलं, ज्यामध्ये गृहखात्याची भूमिका विशेषतः गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर ताणत आहे. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लक्षात घेतल्यास, सरकारला काही कठोर निर्णय घ्यावे लागणार आहेत, अन्यथा त्याचा परिणाम भाजपच्या भविष्यात होईल. सध्याच्या परिस्थितीला घेऊन राज्यातील लोकभावनांचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. महायुती सरकारला स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आपला प्रभाव टिकवून ठेवायचा असल्यास, त्यांना कठोर निर्णय घेण्याची गरज आहे.

**-अनिकेत घनश्याम भंकाळ**

## आजची चित्रोळी



थिरुवल्लुवर विवेकानंद
वंदनिय स्मारकें !
कन्याकुमारी मातेचरणीं
झुकताती मस्तकें !!

मुकुंद कुलकर्णी, मुंबई

# डॉ होमी जहांगीर भाभा



भारताच्या आण्विक शक्तीचे जनक असे ज्यांना म्हटले जाते त्या डॉ होमी जहांगीर भाभा यांचा आज स्मृतिदिन. स्वतंत्र भारताला समर्थ आणि बलवान बनवण्यासाठी ज्या महान व्यक्तींनी जीवाचे रान केले त्यात डॉ होमी जहांगीर भाभा याचे नाव आवर्जून घेतले जाते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणू आणि अवकाश क्षेत्रात जे कार्य केले त्यामुळे जगभर भारताचे नाव झाले. डॉ होमी जहांगीर भाभा यांचा जन्म सदन पारशी कुटुंबात ३० ऑक्टोबर १९०९ रोजी झाला. त्यांचे वडील डॉ जहांगीर भाभा हे बॅरिस्टर होते. त्यांच्या वडिलांना वाचनाची खूप आवड होती त्यामुळे त्यांनी खूप पुस्तके गोळा केली होती त्यात विज्ञान या विषयाचीही पुस्तके होती. डॉ होमी यांना लहानपणापासून विज्ञानाची आवड होती. त्यामुळे त्यांनी विज्ञानाची अनेक पुस्तके वाचून काढली.

शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर होमी यांनी इंजिनिअर व्हावे असे त्यांचा वडिलांना वाटत होते पण होमी यांनी आपल्याला गणित आणि पदार्थ विज्ञान हे विषय आवडतात आणि त्यातच आपण करियर करणार असे वडिलांना ठामपणे सांगीतले. वडिलांनी त्यांना या विषयात करियर करण्यास परवानगी दिली पण आधी इंजिनिअरिंग पूर्ण करण्याची अट घातली. त्यामुळे होमी यांनी १९३० साली केम्ब्रिज विद्यापीठातून पहिल्या श्रेणीत इंजिनिअरिंग पूर्ण केले. तसेच पॉल डिरेक यांच्या मार्गदर्शनाखाली गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयांचा अभ्यासही केला. गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयात त्यांना खूप गती होती त्यामुळे या विषयात त्यांनी अनेक बक्षिसे आणि शिष्यवृत्त्या मिळवल्या. १९४० साली ते भारतात परत आले. भारतात आल्यावर त्यांनी बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थेत प्राध्यापक म्हणून काम केले. १९४५ साली टाटा मूलभूत संशोधन संस्थेची स्थापना करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. पुढे याच संस्थेचे ते संचालक बनले. संचालक असतानाही त्यांनी आपले संशोधन कार्य सोडले नाही. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर १९४८ साली त्यांच्या पुढाकाराने भारत सरकारने अणू ऊर्जा आयोगाची स्थापना केली. या संस्थेचेही ते संचालक होते. या संस्थेत त्यांनी आपल्या संशोधनाला सुरुवात केली, तेंव्हा मुल कण, नवे सिद्धांत, नवे तंत्रे उदयास आली होती. त्यात डॉ होमी भाभा यांनी मोलाची भर टाकली. १९५४ च्या ऑगस्ट महिन्यात भारत सरकारने अणुऊर्जा विकासासाठी स्वतंत्र खातं निर्माण केले त्यावेळी या खात्याचे पहिले सचिव म्हणून डॉ होमी भाभा यांचीच निवड करण्यात आली. या अणुऊर्जा विकास संशोधन खात्याने मुंबईत तुर्भे येथे देशातील पहिले अणू विषयक संशोधन करणारं केंद्र डॉ भाभा यांच्याच नेतृत्वाखाली उभे केले. त्यानंतर १९५६ साली देशातीलच नव्हे तर आशिया खंडातील पहिली अणुभट्टी सुरु करण्यात आली. अणुविषयक व आंतरीक्ष विषयक अशा दोन्हीही क्षेत्रात महत्वपूर्ण आणि भक्कम पाया घालण्याचं श्रेय हे डॉ होमी जहांगीर भाभा यानांच जाते. अणुशक्तीचा वापर विघातक कामासाठी नव्हे विधायक कामासाठी झाला पाहिजे असे त्यांचे मत होते. १९५५ मध्ये जिनिव्हा येथे भरलेल्या आणि संयुक्त राष्ट्र संघामार्फत आयोजित अणुऊर्जेचा वापर शांततामय विकासकार्यासाठी वापर या विषयाच्या परिसंवादाचे डॉ भाभा हे अध्यक्ष होते.

या परिसंवादात त्यांनी अणुऊर्जेचा वापर अणुबॉम्ब तयार करण्यासाठी न करण्याचे आव्हान सर्व देशांना केले होते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणुऊर्जा आणि आंतरीक्ष क्षेत्रात जे महान कार्य केले त्यामुळे त्यांना अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरवले. २४ जानेवारी १९६६ रोजी स्वित्झर्लंड मधल्या मॉ ब्लँ या उंच शिखरावर झालेल्या भीषण अपघातात या महान शास्त्रज्ञाचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या निधनानंतर तुर्भे येथील अणू संशोधन केंद्राचे नाव बदलून भाभा अणुसंशोधन केंद्र असे करण्यात आले. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार**



## मुंबईत खासगी शाळेत बॉम्बची धमकी

**मुंबई (विशाल पाटील) :** मुंबईतील एका शाळेत बॉम्बची धमकी मिळाली आहे. मुंबईतील अंधेरीच्या जोगेश्वरी-ओशिवरा भागातील रायन ग्लोबल स्कूलला ही धमकी देण्यात आली होती. स्थानिक पोलीस आणि बॉम्बशोधक पथकाच्या कर्मचाऱ्यांनी कारवाई केली असून परिसराची झडती घेतली असल्याचं मुंबई पोलिसांनी सांगितलं.

गेल्या वर्षी जानेवारी महिन्यात मुंबईतील धीरूभाई अंबानी इंटरनॅशनल स्कूलला बॉम्ब ठेवण्याची धमकी मिळाली होती. नंतर जुलैपासून अनेक रुग्णालये, मुंबई विमानतळ, अनेक उड्डाणे आणि अगदी आरबीआय मुख्यालयाला ईमेलद्वारे बॉम्बच्या धमक्या देण्यात आल्या.

मुंबईच्या रायन ग्लोबल स्कूलमध्ये आतापर्यंत काहीही संशयास्पद आढळले नाही. मात्र पोलिसांचा शोध सुरू आहे. 'अफझल गँग' म्हणून ओळख असलेल्या एका टोळीने ही धमकी दिली होती. यापूर्वी डिसेंबरमध्ये दिल्लीतील रायन इंटरनॅशनल स्कूलला ईमेलवर बॉम्बच्या धमक्या देऊन लक्ष्य करण्यात आले होते. बॉम्बच्या धमक्या मिळालेल्या इतर अनेक शाळांपैकी ही शाळा होती.

## पान १ वरून...

### मंत्री भरत गोगावलेंचे सुनिल तटकरेंना खुले ...

त्यांच्या विरोधात जाणारे हे मिंधे आहेत , आम्ही कोणाचे मिंधे नाहीत, आम्ही आमच्या पक्षाचे निष्ठावंत आहोत. आम्ही बाळासाहेबांचे सच्चे शिवसैनिक आहोत. आम्ही कोणी येऱ्या गबाळ्याचे सैनिक नाहीत. आमच्या विरोधात पाहिले कोण गेले.. त्याची पहिले चौकशी करा? सुनील तटकरे यांना भरत गोगावले यांनी थेट आव्हानच दिले. रायगड मधील आम्हा तिघांना पाडण्याचा प्रयत्न सुनील तटकरे यांनी केला आहे असा आरोप करीत

हिंमत असेल तर श्री बल्लाळेश्वराच्या समोर छातीवर हात ठेवून सांगा, आम्हाला तिघांना पाडण्याचा प्रयत्न कुणी केला, कुणाला कुणी फसवलं, मंत्री भरत गोगावलेंनी सुनिल तटकरेंना अस खुले आव्हानच दिले. तर भर सभेत जो स्वतःच्या भावाचा होऊ शकला नाही, तो तुमचा आमचा काय होणार, अशी जहरी टीका रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांनी खासदार सुनिल तटकरे यांच्यावर केली. यावेळी माजी तालुकाप्रमुख व डॅशिंग नेते मिलिंद देशमुख यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी शिंदे शिवसेनेत जाहीर पक्षप्रवेश केला. तर याच कार्यक्रमात रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, आ. रवींद्र पाटील, आ. महेंद्र दळवी, आ.महेंद्र थोरवे यांचा जंगी सत्कार करण्यात आला. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले. मिलिंद देशमुख यांना याच कार्यक्रमात शिवसेना रायगड जिल्हा संपर्क प्रमुख पदाची महत्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली, तसे नियुक्तीपत्र मंत्री भरत गोगावले व अन्य आमदारांच्या उपस्थितीत सुपूर्द करण्यात आले. यावेळी मिलिंद देशमुख यांच्यासह तिवरे ग्रामपंचायत सरपंच दिनेश पवार, उपसरपंच अजय देशमुख व अन्य दहा सदस्य, नवघर उपसरपंच संजय मोरे, राम चव्हाण आदींसह शेकडो कार्यकर्त्यांनी भगवा खांद्यावर घेतला. यावेळी प्रास्ताविकात शिवसेना रायगड उपजिल्हा प्रमुख अनुपम कुलकर्णी यांनी सुधागड तालुक्यातील जनतेला भेडसावणारे मूलभूत प्रश्न व समस्यांना सोडवून जनतेला अपेक्षित न्याय देण्याची भूमिका मंत्री महोदय व आमदारांनी घ्यावी अशी विनंती केली. अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पालीला शुद्ध पाणीपुरवठा मिळावा, बायपास चा प्रश्न मार्गी लागावा, तसेच पाली बसस्थानक इमारत निर्माण व्हावी अशी मागणी केली, यावर मंत्री भरत गोगावले यांनी सुधागड पालीला विकासाच्या दृष्टीने न्याय दिला जाईल अशी ग्वाही दिली. मंत्री भरत गोगावले पुढे म्हणाले की आपण महायुतीत सर्वांनी एकत्रित जाण्याचा प्रयत्न करू, एक सोडून असा टोला गोगावले यांनी लगावला. मला पालकमंत्री पद मिळावे यासाठी हजारो शिवसैनिक रस्त्यावर उतरले, ताकत दाखवून दिली, आम्ही एकत्र झाल्यानंतर काय करू शकतो, हे दाखवलं. त्या सर्वांना माझा मानाचा मुजरा. आम्हाला आमच्या नेत्यांना व पक्ष संघटनेला अडचणीत आणायचं नाही. पण वस्तुस्थिती दिसते तेव्हा डोळे झाकायचे नसतात, पेटून उठायची शिकवण आम्हाला वंदनीय बाळासाहेबांनी दिली. आमदार महेंद्र दळवी यांना एकदा तटकरेंनी फसवलं,तरी देखील ते त्यांच्या जवळ जात होते, अशात महेंद्र थोरवे हा मावळा हिमतीने लढत होता. पाली बल्लाळेश्वराकडे मी मागण मागून आलोय, पालकमंत्री पद मिळाव म्हणून. आमच्यावर बल्लाळेश्वराची कृपा होईल. असे गोगावले म्हणाले. मी चारवेळा आमदार झालो, ते दोन वेळा आमदार , जमिनीवर चालायला शिकल पाहिजे. हवेत चालून जमत नाही असा टोला तटकरे यांना लगावला. याचवेळी पक्ष सोडून जाणाऱ्यांवर देखील गोगावले यांनी प्रकाश देसाई यांचे नाव न घेता भाष्य केले. आजचा पक्ष प्रवेश सोहळा संघटनेला ताकत देणारा आहे. कुणी एकजण सोडून गेला तर पक्ष संपत नाही तर जोमाने वाढतो असे मंत्री गोगावले म्हणाले. नव्याने नियुक्ती केलेल्या शिवसेना रायगड जिल्हा संपर्क प्रमुख मिलिंद देशमुख यांनी सर्वांना सोबत घेऊन पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी कामाला लागावे, असे आवाहन केले. लाडक्या बहिणींना योग्य न्याय देऊनच विकास साधला जाईल असे मंत्री गोगावले म्हणाले. यावेळी रोजगार हमी व फलोत्पादन योजनांची सविस्तर माहिती मंत्री भरत गोगावले यांनी दिली.

**सुनिल तटकरे यांची जादू आता संपलेली आहे- थोरवे**

यावेळी आमदार महेंद्र दळवी म्हणाले की सुधागड तालुका हा आदिवासी बहुल तालुका आहे. भरत गोगावले येत्या काळात पालकमंत्री होतील, या तालुक्याला जास्तीत जास्त निधी देऊन विकास गंगा आणली जाईल. याचवेळी आ.दळवी यांनी सुनिल तटकरे यांच्यावर टीका केली. पाली नगरपंचायत मध्ये ही खोडा घालण्याचे काम कुणी केले. तटकरे हे सुसंस्कृत पणाबद्दल वारंवार सांगतात, मात्र ते सर्वांना वारंवार कमी लेखतात, पण १९९२ पासून रायगडच्या प्रत्येक व्यक्तीला मतदाराला माहीत आहे, बॅरिस्टर अंतुले यांनी ज्यांना आशीर्वाद दिला, पुढे काय झालं. हे पहावं. आम्ही यापूर्वी ही पालकमंत्री पदाला विरोध दर्शवून उठाव केला होता. आता ही आम्ही उठाव करू, आम्ही काही झालं तरी राष्ट्रवादीला स्वीकारणार नाही ही भूमिका आम्ही घेतली आहे. भरत गोगावले यांना पालकमंत्री करण्यासाठी आम्ही शिवरायांचे मावळे ताकतीने रस्त्यावर उतरू. आदिती तटकरे यांना पालकमंत्री पदावरून हटविण्यासाठी आम्ही आवाज उठवला, आता ही आवाज उठवून आम्ही पदाला स्थगिती आणली. तटकरे यांची विधाने बालिश बुद्धीची आहेत. लोकसभेला आम्ही तटकरे यांना प्रामाणिकपणे मदत केली. आमच्या जीवावर तटकरे निवडून आले. मात्र त्यांनी माझ्या विरोधात काम केले. माझ्यासारख्या कार्यकर्त्यांनी महाराष्ट्रात बोल बाला असलेल्या शेकापला संपवलं, तुमच्यावरही ती वेळ येईल, तटकरे यांची जादू आता संपली आहे, त्यांची घराणे शाही यापुढे चालणार नाही अशी टीका आमदार दळवी यांनी केली.

आमदार महेंद्र थोरवे म्हणाले की शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे नाव व विचार जोपर्यंत चंद्र सूर्य आहे तोपर्यंत अजरामर राहील. अन्याया विरोधात बाळासाहेब लढले, तोच विचार घेउन आम्ही लढतोय. विरोधक हे शिवसेनेचे खच्चीकरण करायला पाहत आहेत, आम्ही बाळासाहेबांचे शिवसैनिक आहोत, अन्यायाविरुद्ध आम्ही पेटून उठलो, मंत्री भरत गोगावले यांना पालकमंत्री केल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही. तटकरे आमचे संस्कार काढतात पण तुमचे संस्कार अख्या महाराष्ट्राला माहीत आहेत . असा टोला थोरवे यांनी लगावला. आम्ही संस्कृती व सामाजिक बांधिलकी जपतोय, आम्ही स्वाभिमानाने रायगड जिल्ह्यात आमचं वर्चस्व प्रस्थापित करू, आगामी सर्व निवडणुकीत शिवसेना आपला करिश्मा दाखवून देईल असा विश्वास आमदार थोरवे यांनी व्यक्त केला. याच कार्यक्रमात सत्काराला उत्तर देताना भाजपचे आमदार रवींद्र पाटील यांनी सुधागड तालुक्याच्या सर्वांगीण व शाश्वत विकासाला प्राधान्य देऊन काम करू अशी ग्वाही दिली. यावेळी शिवसेना रायगड जिल्हा प्रमुख राजा केणी, नवनिर्वाचित शिवसेना संपर्क प्रमुख मिलिंद देशमुख, उपजिल्हा प्रमुख अनुपम कुलकर्णी, सुधागड तालुका प्रमुख रवींद्र देशमुख, शिवसेना युवा जिल्हा प्रमुख संजय म्हात्रे, उपजिल्हा प्रमुख उद्धव कुथे, संदीप दपके, निलेश घाटवळ, नाना देशमुख, नगराध्यक्ष प्रणाली शेळके , सरपंच कल्पनाताई म्हात्रे सर्व नगरसेवक व नगरसेविका, शिवसैनिक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### निकृष्ट बांधकामामुळे पूल खचला, गडकरींवर...

गडकरी नेहमीच बांधकामाच्या गुवत्तेबाबत आग्रही असतात. याची वाच्यताही ते नेहमी त्यांच्या भाषणात करतात. त्यामुळे त्यांच्याच प्रयत्नाने बांधण्यात आलेला बुटीबोरी उड्डाणपूल उत्तम दर्जाचाच असेल, असा सर्वांनाच विश्वास होता. मात्र उद्घाटनानंतर केवळ साडेतीन वर्षात पुलाचा काही भाग खचल्याने बांधकामावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. महामार्ग प्राधिकरणाने पुलाच्या निकृष्ट बांधकामाची जबाबदारी स्वीकारण्याऐवजी १८७ टन वजनाचा ट्रक गेल्याने पुलास तडे गेल्याचे अजब कारण सांगितले आहे. ट्रक चालकाविरुद्ध पोलिसात गुन्हाही दाखल करण्यात आला आहे. दुसरीकडे दोष दायित्व कालावधीचा आधार घेत संबंधित कंत्राटदारावर या घटनेची जबाबदारी ढकलून प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी स्वत: या प्रकरणातून अंग काढून घेतले आहे.

### भिवंडीत 'मिनी बांगलादेश'- किती लोकांना...

"भिवंडी शहर आणि ग्रामीण भागात एक हजाराहून अधिक बांगलादेशी नागरिकांनी जन्म दाखल्यासाठी अर्ज दिलेत. यापैकी शेकडो बांगलादेशी नागरिकांना स्थानिक तहसील आणि काही ग्रामपंचायतीच्या वतीनं जन्म दाखला देण्यात आलाय. राज्यात दोन लाख बांगलादेशी नागरिक वास्तव्यास आहेत", अशी माहिती सोमैया यांनी दिलीय. तर बांगलादेशी नागरिकांना पुरावा म्हणून ग्रामपंचायती तर्फे देण्यात आलेल्या जन्म दाखल्यांची संपूर्ण चौकशी करुन, दोषी अधिकाऱ्यांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडं करणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

किरीट सोमैया यांनी गुरूवारी (२३ जाने.) भिवंडी तहसीलदार कार्यालयात येऊन तहसीलदारांची भेट घेतली. या भेटी दरम्यान त्यांनी उशिरा जन्म दाखला घेणाऱ्या नागरिकांच्या नोंदींची तपासणी केली. यामध्ये भिवंडी शहर आणि ग्रामीण भागात एक हजाराहून अधिक बांगलादेशी नागरिकांनी जन्म दाखल्यासाठी अर्ज दिल्याचं समोर आलं. यात प्रामुख्यानं मुस्लिम वस्त्या असलेल्या खोणी महापोली आणि पडघा-बोरीवली या ग्रामपंचायतीतील अधिकाऱ्यांनी शेकडो बांगलादेशी नागरिकांना जन्म दाखले दिलेत, असा दावाही किरीट सोमैया यांनी केलाय.

### अमित शाह यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर, ड्रोन...

उपरोक्त कालावधीत कोणत्याही प्रकारचे ड्रोन (मानवरहित विमान), पॅरा ग्लायडर्स, पॅरा मोटर्स, हॉटएअर बलून्स, हलकी विमाने, आदी तत्सम हवाई साधने सक्षम प्राधिकाऱ्यांची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय उड्डाण, वापर करण्यास मनाई करण्यात आली आहे.

उल्लंघन झाल्यास कारवाई जिल्ह्यातील (ग्रामीण) ड्रोन चालक व मालकांनी बुधवार ते शुक्रवार या कालावधीत ड्रोनचे उड्डाण करू नये. तसेच ड्रोनद्वारे करण्यात येणाऱ्या छायाचित्रीकरणाच्या परवानगी बाबतचे संपूर्ण अधिकार प्रशासनाने राखून ठेवले आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या विरूद्ध भारतीय दंड विधान कलम, भारतीय विमान कायदा आणि अन्य प्रचलित कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल, असेही आदेशात नमूद केले आहे.

### नालासोपाऱ्यातील अनधिकृत इमारतीवर...

रहिवाशांनी यावेळी तीव्र नाराजी आणि संताप व्यक्त केला. आमची घरे पाडली जाणार नाहीत असे आश्वासन आम्हाला राजकीय पक्षांनी दिले. आता जिंकून आल्यावर आम्हाला वाऱ्यावर सोडले अशी प्रतिक्रिया येथील रहिवाशांनी दिली.

कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी परिमंडळ २ च्या पोलीस उपायुक्तांनी परिसरात मनाई आदेश लागू केला आहे. गुरूवार मध्यरात्री १२ पासून शुक्रवार मध्यरात्री १२ पर्यंत हा मनाई आदेश लागू असणार आहे. कारवाई दरम्यान राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, नागरिक यांच्याकडून विरोध होऊन कायदा सुव्यस्थेला अडथळा निर्माण होऊ नये यासाठी हा मनाई आदेश लागू केल्याचे परिमंडळ २ च्या पोलीस उपायुक्त पुर्णीमा चौगुले यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालायने पुर्नवसन करण्याची मुभा दिल्याने रहिवाशांना आशा होती. मात्र आता कारवाई सुरू झाल्याने रहिवासी हवालदिल झाले होते. आपला संसार उघड्यावर आल्याने महिलांना अश्रू अनावर झाले होते.

### मोरा-मुंबई रो रो सेवा मार्च २०२६ पर्यंत...

मोरा-मुंबई व अलिबाग आणि उरणला जोडणाऱ्या रेवस ते करंजा मार्गावरील रो रो सेवा खरंच सुरू होणार का अशी शंका व्यक्त केली जात आहे. याचे मुख्य कारण म्हणजे उरणला मुंबईशी जोडणाऱ्या अटल सेतूमुळे मुंबईत वाहने घेऊन जाणारे या सेतूचा वापर करू लागले आहेत. त्यामुळे या जल मार्गावरील रो रो सेवा चालणार का अशीही शंका आहे. मोरा जेट्टीचे काम लवकरच सुरू करण्यात आले असून मार्च २०२६ अखेर पर्यंत पूर्ण करण्यात येईल अशी माहिती मेरिटाईम बोर्डाचे कार्यकारी अभियंता सुधीर देवरे यांनी दिली आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# मोघरपाडा कारशेड डेपो मेट्रो मार्गिका ४.४अ, १० व ११ संदर्भात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न

ठाणे (रोहित जैसवार) - जिल्हा नियोजन समिती सभागृहात मोघरपाडा कारशेड डेपो मेट्रो मार्गिका संदर्भात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली आज शेतकऱ्यांसोबत चर्चा संपन्न झाली.

या बैठकीत जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, प्रांताधिकारी उर्मिला पाटील, नायब तहसिलदार पैठणकर, एमएमआरडीए, भूमी अभिलेख, तसेच इतर संबंधित विभागांचे अधिकारी तसेच प्रकल्पबाधित शेतकरी उपस्थित होते. यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी उपस्थित बाधित शेतकऱ्यांसोबत चर्चा करताना मोघरपाडा कारशेड जागेसंदर्भात आगरी/ कोळी बांधवाच्या विकासाच्या दृष्टीने कुणावरही अन्याय होता कामा नये. मेट्रो कारशेड संदर्भात सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या बैठकीत ज्या शेतकऱ्यांच्या नावावर जमीन आहे तसेच ज्या शेतकऱ्यांच्या नावावर जमीन नाही परंतू कब्जा आहे. ही जमीन शासनाची असेल तर नवी मुंबई क्षेत्रात देणात येणाऱ्या शेतकऱ्यांना मालकी हक्क संदर्भात राज्यात जो मोबदला धोरण राबविले आहे. ज्या शेतकऱ्यांच्या नावावर ७/१२ आहे, त्यांना २२.५ टक्के मोबदला शासनाच्या नियमानुसार देण्यात येईल. ज्या शेतकऱ्यांचे नाव नाही परंतू अतिक्रमण कब्जा आहे व ती जमीन शासनाची आहे, त्या ठिकाणी १२.५ टक्के शासनाच्या नियमानुसार मोबदला देण्यात येईल. मी याच मतदानसंघाचे प्रतिनिधित्व करीत आहे. या शेतकऱ्यांनी मला निवडून दिले आहे. मी त्यांची काळजी निश्चित




घेईन. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांना मोबदला देण्यात येणार आहे. अशा प्रकारे शेतकऱ्यांना मोबदला मिळण्याचे हे राज्यातील पहिलेच उदाहरण आहे. त्यासंदर्भात त्यांना कशा प्रकारचा मोबदला म्हणजे वस्तूनिहाय प्लॉट, तेथील रस्ते, गटारे, भूखंड, इलेक्ट्रॉनिक पोल, शेतकऱ्यांस कसा फायदा होईल व पुनर्वसन कसे होईल, याविषयी त्यांनी सांगितले.

मात्र या बैठकीत सर्व १९८ शेतकरी उपस्थित न राहिल्याने मंत्री महोदयांनी पुढील ७ फेबुवारी रोजी बैठक घेवून पुढील निर्णयाबाबत चर्चा करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. यावेळी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी बाधित शेतकऱ्यांना आपले मत विचारात घेवून हा प्रश्न सोडविला जाईल याची ग्वाही दिली. एफएसआय, बफर झोन, प्लॉट या सर्व मुद्यांबाबत आपण सर्व शेतकऱ्यांशी चर्चा करुनच निर्णय घेवू. याप्रसंगी बाधित शेतकरी बबन दामोदर भोईर आपली कैफियत मांडताना म्हणाले की, कांदळवन जमीन व ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या आहेत, त्यांना सरसकट मोबदला मिळाला पाहिजे. शासनाने जीआर मध्ये २२.५ टक्के व १२ .५ टक्के बाबत केलेला उल्लेख नाही. तसेच मालकीच्या ७/१२हद्दीबाहेर बाबत योग्य निर्णय व्हावा.

विनित ठाकूर यांनी खारभूमी शेतकरी समिती संस्थेस तसेच शेतकऱ्यांना १५ दिवसांची मुदत देऊन शासन व प्रशासनाचे धोरण कळविल्यास आम्ही गावकरी चर्चा करुन निर्णय घेवू. या प्रकल्पास आमचा विरोध नाही परंतू मोबदला कशा प्रकारचा देणार, याचा लेखी उल्लेख असावा, असे मनोगत व्यक्त केले.

यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या अटी व शर्तीसह खेळाचे मैदान, हॉस्पिटल, शाळा, कौशल्य शिक्षण, नजराना माफ, मेट्रो कारशेडला श्री कापरा देवाचे नाव देणे आदी विषयांबाबत लेखी निवेदन दिले.

याप्रसंगी परिवहन मंत्री यांनी १९८ बाधित सर्व शेतकऱ्यांना उपस्थित राहण्यासंदर्भात सूचना देवून दि.०७ फेब्रुवारी २०२५ रोजी पुढील बैठक होईल, असे शेवटी सांगितले.

# कल्याण पूर्वेत भव्य कोंकण महोत्सवात डॉ. पल्लवी सापळे अधिष्ठाता जे. जे. हॉस्पिटल यांची उपस्थिती

## कोंकणी कला, खाद्य, संस्कृती बरोबरच पर्यटन क्रीडा क्षेत्राचेही होणार दर्शन !

कल्याण (विवेक गुंजाळ) - कोंकण उत्कर्ष प्रतिष्ठान कल्याण - महाराष्ट्र या सामाजिक संस्थेच्या विद्यमाने १७ ते २६ जानेवारी २०२५ या दरम्यान कल्याण पूर्वेतील सिद्धार्थ नगर जवळील पोटे मैदानात भव्य दिव्य स्वरूपात 'कल्याण कोंकण महोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. सलग १० दिवस चालणाऱ्या या महोत्सवांत कोंकणची कला-खाद्य-संस्कृती या बरोबर क्रीडा, उद्योग, पर्यटन यांचे होणारे दर्शन! कोकण उत्कर्ष प्रतिष्ठान च्या या वर्षीच्या उत्सवाचे ९ वे वर्ष असून या वर्षीच्या कोकण महोत्सवास कल्याणकरांचा मोठा प्रतिसाद




मिळत असल्याचे प्रतिष्ठाणचे संस्थापक अध्यक्ष संजय मोरे यांनी सांगीतले. या उत्सवा दरम्यान प्रती दिन सायं ६ ते १० या वेळेत उत्सव ठिकाणी विविध सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून या उत्सवा दरम्यान कल्याण पूर्व सौ. सुलभाताई गायकवाड आमदार यांच्या हस्ते जे. जे. हॉस्पिटलच्या अधिष्ठाता डॉ. पल्लवी सापळे मॅडम यांचा भव्य सत्कार करण्यात आला. तृतीय श्रेणी संघटनेचे अध्यक्ष सुरेश तांबे, बाह्य रुग्ण विभागातील कर्मचारी भरत सोलंकी, सुशांत जाधव, संजय पालांडे, गणेश सुर्वे, संतोष सुतार, मयूर जाधव, विजय धुरी हे सुद्धा कार्यक्रमाला उपस्थित होते.

प्रतिष्ठाणचे अध्यक्ष संजयजी मोरे, कार्याध्यक्ष सुभाष म्हस्के, उपाध्यक्ष उत्तम पवार, सचिव संदिप तांबे, खजिनदार संतोष परब, सहसचिव दिपक गायकवाड, उप खजिनदार संतोष गुरव, प्रसिद्धीप्रमुख अजय पवार, सल्लागार कैलास कालेकर, योगेश शिंदे, सदानंद शिंदे, विजय सावंत, उमेश निकम व सर्व पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते उपस्थित होते.



ठाणे जिल्हा परिषद महावाचन उत्सव २०२४-२५ सालातील वाचन स्पर्धेत जिल्हा परिषद शाळा आंबेले खुर्द. येथील विद्यार्थी कुमार चिराज सुभाष गडगे इ.३री हा लहान गटात तालुक्यात द्वितीय आला आहे. जिल्हा शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे यांच्या हस्ते आज बी. जे. हायस्कूल टेंभिनाका ठाणे येथे बक्षिस देऊन सत्कार करण्यात आला.

# महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे "आदर्श जिल्हा" आणि "उत्तम कार्यकर्ता" पुरस्कार जाहीर

## ठाणे जिल्हा समन्वय समितीचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार गौरव

ठाणे (विशाल कारंडे) - राजपत्रित महासंघाच्या ३९ व्या वर्धापनदिनानिमित्त शुक्रवार, दि. ०७ फेब्रुवारी २०२५ रोजी आयोजित विशेष कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर मान्यवरांच्या हस्ते अधिकारी महासंघ



कल्याणकेंद्र (नियोजित), बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१ येथे "आदर्श जिल्हा" पुरस्कारप्राप्त जिल्हा समिती आणि "उत्तम कार्यकर्ता" पुरस्कारप्राप्त अधिकाऱ्यांना गौरविण्यात येणार आहे, असे महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे मुख्य सल्लागार तथा संस्थापक ग.दि.कुलथे, अध्यक्ष विनोद देसाई, कोषाध्यक्ष नितीन काळे, सरचिटणीस समीर भाटकर आणि दुर्गा महिला मंचाच्या अध्यक्षा सिद्धी संकपाळ यांनी कळविले आहे. महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाच्या वतीने उल्लेखनीय कार्याबद्दल ठाणे जिल्हा समन्वय समितीस "आदर्श जिल्हा" तसेच कार्यकारिणीचे अध्यक्ष तथा निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने, सरचिटणीस तथा जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप आणि कोकण विभागीय सहसरचिटणीस तथा वैद्यकीय अधिकारी डॉ.अविनाश भागवत यांची "उत्कृष्ट कार्यकर्ता" म्हणून राज्यस्तरीय निवड करण्यात आली आहे.

# कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळाच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी "अंतर्गत तक्रार निवारण समिती" स्थापन करावी

ठाणे (सम्यक कासारे) - कामाच्या ठिकाणी लैंगिक छळवणूकीस प्रतिबंध कायद्यानुसार, १० किंवा १० पेक्षा अधिक कर्मचारी असलेल्या प्रत्येक आस्थापनेमध्ये महिला तक्रार निवारण समिती असणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक, खासगी आस्थापनांनी अशा समितीचे गठन करण्याचे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय बागूल यांनी केले आहे. शासकीय, निमशासकीय कार्यालय, संघटना, महामंडळे, आस्थापना, स्थानिक



प्राधिकरण किंवा शासकीय कंपनी किंवा नगरपरिषद किंवा सहकारी संस्था अशा सर्व आस्थापना, तसेच कोणतेही खाजगी क्षेत्र, संघटना किंवा खाजगी उपक्रम/ संस्था, एंटरप्रायजेस, अशासकीय संघटना, सोसायटी, ट्रस्ट, उत्पादक, पुरवठा, वितरण व विक्री यासह वाणिज्य, व्यावसायिक, शैक्षणिक, करमणूक, औद्योगिक, आरोग्यसेवा किंवा वित्तीय कामकाज पार पाडणारे युनिट किंवा सेवा पुरवठादार, रुग्णालये, शुश्रुषालये, क्रिडा संस्था, प्रेक्षागृहे, क्रीडा संकुले आदी ठिकाणी किंवा अधिनियमात नमूद केलेल्या कामाच्या शासकीय व खाजगी क्षेत्रातील कार्यालयाच्या ठिकाणी शासन निर्णयाप्रमाणे अंतर्गत तक्रार समिती गठित करणे बंधनकारक आहे. समिती न स्थापल्यास ५० हजार दंड- अधिनियम कलम २६ मध्ये जर एखाद्या मालकाने अंतर्गत तक्रार समिती स्थापन केली नाही आणि कायद्यातील व नियमातील विविध तरतुदींचे व जबाबदाऱ्यांचे पालन न केल्यास मालकाला ५० हजार रुपयापर्यंत दंड होईल. दुस-यांदा आढळल्यास परवाना रद्द, दुप्पट दंड अशी तरतूद आहे. तरी ठाणे जिल्ह्यातील सर्व आस्थापनांनी अंतर्गत तक्रार समिती गठित करुन तसा अहवाल जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, ठाणे नियोजन भवन २ माळा, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, कोर्ट नाका ठाणे येथे तात्काळ सादर करावा, तसेच Email- dwedothane२३४@gmail.com, dwcdothane@yahoo.co.in या मेल आयडीवर पाठविण्यात यावा, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी श्री. संजय बागूल यांनी केले आहे.

# कल्याणकारी योजनांमधील वीज ग्राहकांचा सहभाग वाढवा

## सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे यांचे निर्देश; पालघर जिल्ह्याचा आढावा

कल्याण (गणेश बागडे) - महावितरणकडून मागेल त्याला सौरपंप, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी, प्रधानमंत्री सुर्यघर मोफत वीज, अभय आदी ग्राहक हिताच्या विविध योजना सुरू आहेत. ग्राहक कल्याणाच्या या योजनांमध्ये अधिकाधिक ग्राहक सहभागी व्हावेत, यादृष्टीने काम करण्याचे निर्देश महावितरणच्या कोकण प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे (भाप्रसे) यांनी दिले.

पालघर जिल्ह्यांतर्गत महावितरणच्या वसई आणि पालघर मंडल कार्यालयांचा आढावा घेण्यासाठी बुधवारी व गुरुवारी (२३ जानेवारी) आयोजित बैठकांमध्ये जगदाळे बोलत होते.



कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता चंद्रमणि मिश्रा, वित्त व लेखा विभागाचे महाव्यवस्थापक अनिल बऱ्हाटे यांची या बैठकांना प्रमुख उपस्थिती होती. जगदाळे म्हणाले, प्रधानमंत्री सुर्यघर मोफत वीज योजनेच्या माध्यमातून ग्राहक विजेच्या बाबतीत स्वयंपुर्ण होण्यासोबतच अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळवू शकतात. या योजनेत स्वत:हून ग्राहक सहभागाचे लक्ष्य निर्धारित करून ते साध्य करण्यासाठी काम करा. मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेतून शेतीपंपांना दिवसा व शाश्वत वीजपुरवठ्याची हमी असल्याने कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना या योजनेत सहभागी करून घ्यावे. सौरग्राम आणि मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेच्या कामांना स्वंयस्फुर्तीने गती देण्याचे निर्देश त्यांनी दिले. उपलब्ध मनुष्यबळाचा कार्यक्षम वापर करून चालु वीजबिलासह थकबाकी वसुलीचे लक्ष्य साध्य करण्यात नियमितता ठेवा. ग्राहकांना विहित कालावधीत, सहज आणि शक्य तितक्या सोप्या पध्दतीने तत्काळ नवीन वीज जोडण्या द्याव्यात.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार एखाद्या जागेचा मालकी हक्क बदलला तरीही त्या जागेवरील वीजबिल थकबाकी अबाधित राहते. याचा आधार घेऊन कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित ग्राहकांकडील थकबाकी वसुल करावी. या ग्राहकांना अभय योजनेच्या लाभातून मुख्य प्रवाहात आणावे.

अधिक वीजगळती असलेल्या वीज वाहिन्यांवर नियमितपणे मोहिमा राबवून गळती कमी करण्याच्या सूचना सहव्यवस्थापकीय संचालक जगदाळे यांनी दिल्या. पालघर मंडलाचे अधीक्षक अभियंता दिलीप खानंदे, वसई मंडलाचे अधीक्षक अभियंता संजय खंडारे, पायाभूत आराखडा विभागाचे अधीक्षक अभियंता महेश अंचिनमाने यांच्यासह सर्व कार्यकारी अभियंते, अतिरिक्त कार्यकारी अभियंते व उपकार्यकारी अभियंते या बैठकांना उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी कार्यालय येथे दि. २५ जानेवारी रोजी १५ व्या राष्ट्रीय मतदार दिवस कार्यक्रमाचे आयोजन

ठाणे (विशाल पाटील) - दि.२५ जानेवारी २०२५ रोजी १५ वा राष्ट्रीय मतदार दिवस राज्यस्तर, जिल्हास्तर व मतदान केंद्र स्तरावर साजरा करावयाचा आहे. या १५ व्या राष्ट्रीय मतदार दिवसासाठी "Nothing like voting. I Vote for sure" हा विषय (Theme) आयोगाकडून देण्यात आला आहे. मा.भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनेनुसार दि.२५ जानेवारी २०२५ हा कामकाजाचा दिवस नसल्याने दि.२४ जानेवारी २०२५ रोजी जिल्ह्यातील सर्व कार्यालयामध्ये मतदान शपथ (मराठी, इंग्रजी व हिंदी मधील शपथेचा नमुना सोबत जोडला आहे) घेण्यात येणार आहे.

त्यानुषंगाने ठाणे जिल्ह्याचा जिल्हास्तरीय कार्यक्रम दि.२५ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता नियोजन भवन, पहिला मजला, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे हे असतील तर जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांचे मतदार नोंदणी अधिकारी देखील उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून बित्तंबातमी वृत्तपत्राचे संपादक तथा मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, ठाणे भूषण तथा सरस्वती विद्या प्रसारक ट्रस्ट, ठाणेच्या अध्यक्ष श्रीमती एम.एस. कोरडे, चित्रपट दिग्दर्शक नितीन कांबळे हे तर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणेचे सचिव ईश्वर सुर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या कार्यक्रमात ठाणे जिल्हा को.ऑप.हौ.सो. फेडरेशनचे सिताराम राणे, अपंग विकास महासंघ, कल्याणचे अध्यक्ष अशोक भोईर, किन्नर अस्मिता नीता केणे व ठाणे सिटिझन्स फाऊंडेशनचे अध्यक्ष कॅस्बर ऑगस्टीन हे निवडणूक दूत म्हणून उपस्थित राहणार आहेत.या कार्यक्रमामध्ये नवमतदारांना निवडणूक ओळखपत्राचे वाटप व उत्कृष्ट काम केलेल्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचा प्रमाणपत्र देवून सत्कार करण्यात येणार आहे.

# विजय सेतुपतीचा क्राईम थ्रिलर सिनेमा 'विदुथलाई २' ओटीटी वर रिलीज



दाक्षिणात्य तमिळ सिनेस्टार अभिनेता विजय सेतुपतीचा चाहता वर्ग विविध भाषिक आहे. त्यामुळे त्याचा एखादा सिनेमा थिएटरमध्ये आला की, चाहत्यांचा उत्साह पाहण्यासारखा असतो. गतवर्षी ख्रिसमसच्या मुहूर्तावर विजय सेतुपतीचा दमदार क्राईम थ्रिलर सिनेमा 'विदुथलाई २' प्रदर्शित झाला होता. जो डिजिटल प्लॅटफॉर्मवर कधी येईल याबाबत प्रेक्षकांमध्ये उत्सुकता होती. अखेर मोठ्या प्रतिक्षेनंतर आता हा सिनेमा ओटीटी प्लॅटफॉर्मवर रिलीज झाला आहे. दाक्षिणात्य सिनेमाचे प्रसिद्ध सिनेदिग्दर्शक वेत्रिमारण यांचा हा सिनेमा कोणत्या ओटीटी प्लेटफॉर्मवर पाहता येईल? याबाबत सविस्तर माहिती घेऊया.

'महाराज' सारखा दमदार सिनेमा दिल्यानंतर विजय सेतुपतीच्या २०२३ मध्ये आलेल्या 'विदुथलाई' सिनेमाचा २०२४ वर्षअखेरीस सीक्वल रिलीज झाला. हा सिनेमा प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर उचलून घेतला. ज्यांना थिएटरमध्ये सिनेमा पाहणे शक्य झाले नाही ते गेल्या बऱ्याच काळापासून ओटीटी रिलीजच्या प्रतीक्षेत होते. अखेर त्यांच्या प्रतिक्षेला पूर्णविराम लागला आहे. लोकप्रिय ओटीटी प्लॅटफॉर्म अमेझॉन प्राईम व्हिडिओवर अलीकडेच १९ जानेवारी २०२५ रोजी हा सिनेमा प्रदर्शित झाला आहे. कोणत्याही पब्लिसिटीशिवाय केलेल्या ओटीटी रिलीजमुळे अद्याप अनेक प्रेक्षक यापासून अनभिज्ञ आहेत.

मेकर्सने 'विदुथलाई २' गुपचूप ओटीटीवर प्रदर्शित केला आहे. त्यामुळे आता प्रेक्षक घरबसल्या हा क्राईम थ्रिलर सिनेमा एन्जॉय करू शकणार आहेत. असे असले तरीही हिंदी भाषिक प्रेक्षकांना मात्र अजून काही काळ हा सिनेमा पाहण्यासाठी प्रतिक्षा करावी लागणार आहे. कारण, मेकर्सने हा सिनेमा केवळ तमिळ भाषेत ओटीटीवर प्रदर्शित केला आहे. ज्यामुळे हिंदी भाषिक प्रेक्षक नाराज होऊ शकतात. या सिनेमाचा पहिला भाग देखील या ओटीटी प्लॅटफॉर्मवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

### 'विदुथलाई २'ने दिली नाना पाटेकर यांच्या 'वनवास'ला टक्कर

'विदुथलाई २' हा सिनेमा २० डिसेंबर २०२४रोजी थिएटरमध्ये रिलीज झाला. या सिनेमाला बॉक्स ऑफिसवर चांगला प्रतिसाद मिळाला. हा सिनेमा प्रसिद्ध अभिनेता नाना पाटेकर यांच्या 'वनवास' चित्रपटाच्या तोडीस तोड ठरला. मात्र, हा डंका फार काळ टिकला नाही. कालांतराने या सिनेमाच्या कलेक्शनला मोठा ब्रेक लागल्याचे दिसले. एकंदरच नेट कलेक्शनबद्दल बोलायचं झालं तर, ४० करोड़पेक्षा अधिक कमाई झाली आहे.

# रामराज्याच्या दिशेने नवे पाऊल : 'मिशन अयोध्या' २४ जानेवारीपासून चित्रपटगृहात!




अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिराच्या लोकार्पण वर्षपूर्तीचे औचित्य साधत, शुक्रवार २४ जानेवारी २०२५ पासून 'मिशन अयोध्या' हा बहुचर्चित चित्रपट महाराष्ट्रभरातील १०० हून अधिक चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होत आहे. प्रभू श्रीरामांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि त्यांच्या रामराज्याची संकल्पना पुढे नेण्यासाठी प्रेरणादायी ठरणारा हा चित्रपट त्याच्या सशक्त कथेमुळे प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यातही अव्वल आहे.

### एक चित्रपट नव्हे, तर एक प्रेरणादायी प्रवास...

निर्माते कृष्णा दादाराव शिंदे, सौ. योगिता कृष्णा शिंदे त्यांच्या 'आर के योगिनी फिल्म्स प्रॉडक्शन प्रा. लि.' निर्मित 'मिशन अयोध्या' हा केवळ एक मनोरंजनात्मक चित्रपट नसून, रामभक्तांच्या हृदयातील प्रभू श्रीरामांशी जोडणारा आणि त्यांचे विचार नव्या पिढीपर्यंत नेणारा एक प्रेरणादाई प्रवास आहे. रामराज्याच्या संकल्पनेला नव्या दृष्टीने उलगडणाऱ्या या कलाकृतीतून एक महत्त्वाचा प्रश्न विचारला जातो: पुढच्या पिढ्यांना आपण कोणते प्रभू श्रीराम शिकवणार आहोत? रावणावर विजय मिळवणारे योध्दा राम, की रामराज्याच्या आदर्शाची स्थापना करणारे राजा राम?

### चित्रपटाबद्दल काय म्हणतात लेखक-दिग्दर्शक समीर रमेश सुर्वे?

"प्रभू श्रीरामांच्या अयोध्येतील जन्मभूमीमुळे या मंदिराला जागतिक पातळीवर अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. या राष्ट्रमंदिराने देशभरातील प्रत्येक रामभक्ताला एका धाग्यात जोडले आहे. आपण रामायण ऐकले, पाहिले; मात्र रामराज्याच्या संकल्पनेला मूर्त स्वरूप देण्यासाठी सर्व भारतीयांनी एकत्र येण्याची गरज आहे. प्रभू श्रीराम हे कोणत्याही जाती-धर्मापुरते सीमित नाहीत; ते प्रत्येक भारतीयाचे आहेत. म्हणूनच, 'मिशन अयोध्या' हा केवळ एक चित्रपट नाही, तर राष्ट्रमंदिराच्या संरक्षणाची आणि त्याच्या महत्त्वाची जाणीव जागवणारी प्रेरणादायी कलाकृती आहे," असे लेखक-दिग्दर्शक समीर रमेश सुर्वे यांनी सांगितले.

### चलो अयोध्या - २५ भाग्यवान प्रेक्षकांना 'अयोध्या' वारीची संधी

येत्या शुक्रवारी प्रदर्शित होणारा बहुचर्चित 'मिशन अयोध्या' हा चित्रपट पहिल्या चार दिवसात पाहणाऱ्या २५ भाग्यवान प्रेक्षकांना 'शीतल ट्रॅव्हल सोल्युशन्स'द्वारे अयोध्यावारीची संधी मिळणार आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील हा चित्रपट पाहणारे प्रेक्षक या संधीचा फायदा घेऊ शकतात. पहिल्या ३ दिवसांत चित्रपटगृहात जाऊन सिनेमा पाहणाऱ्या प्रेक्षकांनी त्यांचा तिकीटासोबतचा सेल्फी फेसबुक किंवा इंस्टाग्रामवर पोस्ट करून @rkyoginiproductions ला टॅग करून #MissionAyodhyaContest हा हॅशटॅग वापरायचा आहे.

# मराठमोळी अभिनेत्री ते सुप्रसिद्ध क्रिकेटपटूची पत्नी



'चक दे इंडिया' सिनेमामुळे ओळख मिळालेली सागरिका घाटगे ही प्रसिद्ध क्रिकेटपटू झहीर खानची पत्नी आहे. सागरिका मुळची कोल्हापूरची. कोल्हापूरमध्ये ८ जानेवारी १९८६ मध्ये राजघराण्यात सागरिकाचा जन्म झाला. विशेष म्हणजे सागरिका शाहू महाराजांच्या घराण्यातील आहे तर सागरिकाची आजी सीता राजे घाटगे ह्या इंदोरचे राजे तुकोजीराव होळकर यांची मुलगी. सागरिकाचे बालपण कोल्हापूरमध्ये गेले तर शिक्षण तिने अजमेर येथुन केले.

### अभिनयाची सुरूवात

घरातील वातावरणामुळे सागरिका अभिनयाकडे वळली. सागरिकाचे वडील विजयेंद्र घाटगे हे हिंदी, मराठी चित्रपटसृष्टीतील नावाजलेले अभिनेते होते. त्यामुळे लहानपणापासूनच तिला अभिनयात रस होता. घारे डोळे, वर्ण गोरा, देखणं रूप लाभलेली सागरिका दिसायला खूपच सुंदर आहे. त्यामुळे शाळेत असल्यापासून सागरिकाला मॉडलिंग आणि सिनेमाच्या ऑफर मिळत होत्या.

### उत्तम हॉकीपटू

सागरिका अभ्यासात हूशार तर होतीच शिवाय खेळातही अव्वल होती. सागरिका उत्तम हॉकीपटू असून तिने राष्ट्रीय स्तरावर हा खेळ खेळला आहे. आजतागायत तिला अनेक बक्षिसे देखील मिळाली आहेत. सागरिकाच्या अभिनयाविषयी बोलायचे झाल्यास सागरिकाच्या पहिल्यांदा चक दे इंडिया या सिनेमात दिसली होती. या चित्रपटात तिने हॉकीपटूची भूमिका साकारली होती. या चित्रपटानंतर तिने अनेक कामे केली. जसे की, 'सागरिका फॉक्स', 'मिले ना मिले हम', 'दिल दारिया'. सतीश राजवाडे यांच्या 'प्रेमाची गोष्ट' या मराठी सिनेमातही सागरिका झळकली होती. याशिवाय 'खतरो के खिलाडी' या रिॲलिटी शोमध्ये अंतिम फेरीपर्यंत मजल मारली होती. केवळ मराठी, हिंदीच नव्हे तर सागरिका पंजाबी सिनेमांमध्ये काम करते.

### क्रिकेटपटूशी लग्न

सागरिकाने २०१७ साली क्रिकेटर झहीर खानशी लग्नगाठ बांधली. त्यांचे रिलेशन गुप्त ठेवून साखरपुड्याचे फोटो शेअर करत सागरिका आणि झहीरने सर्वांनाच सुखद धक्का दिला होता. सागरिका आणि झहीर खान पहिल्यांदा एका पार्टीत भेटले आणि तेव्हा पाहताच क्षणी झहीरला सागरिका आवडली होती. ओळख झाल्यानंतर काही दिवसांनी ते एकमेकांना डेट करू लागले. पण, आपल्या लग्नात अडचणी येणार हे दोघांनाही माहित होते. कारण सागरिका हिंदू तर झहीर मुस्लिम आहे. झहीरने सागरिकाचा 'चक दे इंडिया' चित्रपट दाखवत घरच्यांना लग्नासाठी मनविले तर झहीरचे अस्खलित मराठी ऐकून सागरिकाच्या घरच्यांनी त्यांच्या लग्नाला होकार दिला. अखेर २०१७ साली दोघांनी लग्नगाठ बांधली.

# या विंटर सीझनमध्ये साडीसोबत स्टाईल करा जॅकेट

हिवाळ्याच्या मोसमात, लोकांना बहुतेक वेळा वेस्टर्न आउटफिट्स स्टाईल करणे आवडते, परंतु लग्न किंवा कोणताही विशेष कार्यक्रम असेल तर मुली सर्वात जास्त साड्या नेसतात, त्यामुळे त्यांच्या वॉर्डरोब कलेक्शनमध्ये नक्कीच वेगवेगळया डिझाइनच्या साड्या असतात. पण हिवाळ्यात साडीला स्टाईल करणं थोडं कठीण होऊन बसतं कारण आपल्याला थंडीपासून वाचायचं असतं आणि फॅशन लूकही क्रिएट करायचा असतो. यासाठी तुम्ही साडीसोबत वेगवेगळ्या डिझाईन्सचे जॅकेट घालू शकता.सुंदर दिसण्यासाठी तुम्ही बाजारातून साडीच्या रंगाशी जुळणारे जॅकेट खरेदी करू शकता आणि स्टाईल करू शकता, यामुळे तुमचा लूक खूप सुंदर दिसू शकेल. तुम्ही तुमच्या जॅकेटला या कॉन्ट्रास्ट करून स्टाइल करू शकता. उदाहरणार्थ काळ्या रंगावर गुलाबी, हिरव्यासोबत पिवळा किंवा लाल, निळ्यासोबत केशरी इत्यादी. बाजारात तुम्हाला रेडिमेड डिझाइनमध्ये अशा प्रकारचे जॅकेट मिळतील. त्यामुळे तुम्ही ते रु. १,००० ते रु. १,२०० मध्ये खरेदी करू शकता आणि कोणत्याही कार्यक्रमात साडीसोबत स्टाईल करू शकता.जर तुम्ही प्लेन साडी नेसत असाल तर तुम्ही त्यासोबत लांब प्रिंटेड जॅकेटही स्टाईल करू शकता . या प्रकारचे जॅकेटसही तुम्हाला बाजारात सहज मिळू शकतील. जे तुम्ही साडीशी कॉन्ट्रास्ट करू शकता. यावर तुम्ही त्याच्यासोबत मॅच होऊ शकेल असा बेल्ट घालू शकता. यामुळे एक स्टाइलिश लूक क्रिएट होऊ शकेल. हे तुम्ही कोणत्याही लग्नात किंवा समारंभात घालू शकता. या प्रकारचे जॅकेट तुम्हाला बाजारात २,००० ते २,५०० रुपयांना मिळेल. जर तुम्हाला लांब जॅकेट घालायला आवडत नसेल, तर तुम्ही साडीसोबत शॉर्ट जॅकेटही स्टाईल करू शकता, यातही तुम्हाला प्रिंट आणि प्लेन अशा दोन्ही डिझाइन्स बाजारात सहज मिळतील. साडीच्या कलर कॉन्ट्रास्टनुसार ती खरेदी करा आणि स्टाईल करा. या प्रकारच्या जॅकेटसह, आपल्याला बऱ्याच ॲक्सेसरीज स्टाईल करण्याची आवश्यकता नाही. केवळ हे घातल्याने देखील तुमचा लूक चांगला दिसेल. जेव्हा आपण योग्य ब्लाउज किंवा जॅकेट परिधान करतो तेव्हाच साडी खुलून दिसते. यामुळे आपला लूक हटके आणि वेगळा ठरतो. त्यामुळे स्वत:च्या बॉडी टाइपनुसार आणि कलर कॉम्बिनेशन नुसार परफेक्ट जॅकेट निवडण्याचा प्रयत्न करा.







# अमेय वाघ व हेमंत ढोमे यांच्यात अनेक वर्षे होता अबोला



हेमंत ढोमे दिग्दर्शित 'फसक्लास दाभाडे' हा चित्रपट लवकरच प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात अमेय वाघ क्षिती जोग व सिद्धार्थ चांदेकर प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत. कलाकार म्हणून एकत्र काम करत असतानाच हेमंत ढोमे व अमेय वाघ हे खूप चांगले मित्रही आहेत. मात्र, काही वर्षांपूर्वी अमेय वाघ व हेमंत ढोमे यांच्यामध्ये वाद झाला होता, त्यांच्यात अबोला होता. तो अबोला का होता, ते परत कधी बोलायला लागले याबद्दल त्यांनी मुलाखतीत वक्तव्य केले आहे. अमेय वाघ व हेमंत ढोमे यांनी बोल भिडूच्या यूट्यूब चॅनेलवर दिलखुलास गप्पा मारल्या. यावेळी अमेयने हेमंतला म्हटले, "इतकी वर्षे मध्ये लोटली. आपला काही संपर्कच नव्हता. तर या इतक्या वर्षांत तुला माझी कधी आठवण झाली का? तुला असं वाटलं का की याच्याशी आपण बोलावं? संपर्क करावा किंवा असं काही तुझ्या आयुष्यात झालं का की तुला वाटलं की आता अम्या असता तर बरं झालं असतं?" यावर बोलताना हेमंत ढोमेने म्हटले, "मधल्या काळात आपले काही खटके उडाले. ज्यामध्ये आपला थेट सहभाग नव्हता. तर त्यावेळी मला असं झालं की अमेयने माझी बाजू का घेतली नाही. भलेही भांडण झालं असेल, मी चूक किंवा बरोबर असेन, पण त्याने बसून असं का बोललं नाही की त्याचं अमुक अमुक गोष्टी चुकल्या असतील, तुमचं हे चुकलं असेल; पुढे जाऊयात. मला असं वाटलं की, अमेय हे कदाचित करू शकत होता. पण, त्याने हे का केलं नाही असा विचार मी अनेक वर्ष करत होतो." "साधारण २०११ ला मी आणि क्षिती भेटलो. तिथून माझ्या डोक्यातील घोळ जरा कमी व्हायला सुरुवात झाली. माझ्या आयुष्यातही खूप भयानक घटना घडल्या होत्या. मी एक सिनेमा केला, सिनेमाच्या शूटिंगदरम्यान एक नाटक करत होतो. त्या नाटकाच्या प्रयोगाला पोहोचू शकलो नाही, मग बदनामी झाली. नवा गडी बिघडला अशा टायटलच्या बातम्या आल्या. त्या काळात असं सगळं खूप झालं. हे सगळं मी २००९-१० ची गोष्ट सांगतोय आणि तेव्हा असं झालेलं की आपलं काय चाललंय? कामावरून खटका उडाला आणि मित्र तुटले. यामध्ये थेट माझा काही सहभाग नव्हता; म्हणजे मी असं केलं म्हणून असं घडलं. तेव्हा मला तुझी आठवण आली, नाही अशातला भाग नाही. निपुणही होता, तूही होतास. आपल्या तिघांबद्दल बोलायचं तर मला त्याच्यापेक्षा तुझी आठवण जास्त आली, कारण आपण एका वेगळ्या लेव्हलला जास्त कनेक्टेड होतो. आपण ज्या पार्श्वभूमीतून आलो, ज्या कुटुंबातून आलो, आपले आई-बाबा खूपच शिक्षित वैगेरे असं काही नव्हतं. त्यांचं त्यांनी जे जमवून आपल्याला वाढवलंय ते वाढवलंय. त्यामुळे तेव्हा मला असं वाटायचं की त्याला कळेल आपल्याला आता काय वाटतंय, तर तेव्हा आपण बोलतच नव्हतो. क्षिती जेव्हा भेटली ना, तर तिच्याशी बोलल्यानंतर ती म्हटली होती की तुम्ही बालिश आहात. आपलं वयच होतं, एकमेकांबद्दल वाईट मनात काही नव्हतं. आपलं वय हीच समस्या होती." यावर अधिक बोलताना अमेय वाघने म्हटले की, क्षितीबरोबर जेव्हा माझी मैत्री झाली, त्यानंतर आमच्यात यावर बोलणं झाल्यावर मला याची जाणीव झाली की पुढं गेलं पाहिजे. त्याला खूप वर्षे झाली, ते मागे सोडलं पाहिजे. पुढे अमेयने हेमंतला विचारले की, तुला तो प्रसंग आठवतोय का, ज्यामुळे आपण परत बोलायला लागलो? यावर बोलताना हेमंतने म्हटले, "मला तुझ्याबाबतीत टाइम लाइन आठवत नाही. तू आणि मी बोलायचं थांबलो तो क्षण मला आठवत नाही.

## राशी भविष्य




**मेष** – प्रेम संबंधांमध्ये समजून आणि धैर्याने वागा. कामकाजी दृष्टीने चांगला बदल घडू शकतो. आर्थिक स्थिती सुधारेल.

**वृषभ** – महत्त्वाचे निर्णय घेताना अधिक विचार करा. सकारात्मक परिणाम दिसतील. घरातील वातावरण चांगले राहील.

**मिथुन** – आर्थिक बाबतीत चांगले बदल होतील. वैयक्तिक जीवनात चांगले संबंध राहतील. संवादाबाबत काळजी घ्या.

**कर्क** – थोडा मानसिक ताण येऊ शकतो, परंतु कामात यशाची शक्यता आहे. आपली भावना स्पष्टपणे व्यक्त करा.

**सिंह** – विचारांत नाविन्यता आणा. पारिवारिक जीवन सुखी राहील. तणाव कमी करण्यासाठी मानसिक विश्रांती घ्या.

**कन्या** – कुटुंबासोबत वेळ घालवाल. शारीरिक स्वास्थ्यासाठी वेळ काढा. जवळच्या लोकांशी चांगले संबंध राहतील.

**तुळ** – कारकिर्दीत चांगले बदल घडतील. तुमच्या कामाची ओळख वाढेल. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**वृश्चिक** – काही महत्त्वाच्या गुंतवणूक संधी येऊ शकतात. आपल्या वैयक्तिक व व्यावसायिक जीवनात संतुलन राखा.

**धनु** – करियरमध्ये क्षुल्लक अडचणी असू शकतात, परंतु योग्य निर्णय घेतल्यास यश मिळेल. संबंध मजबूत होतील.

**मकर** – कार्यक्षेत्रात कामाचा व्याप वाढेल. रागावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. आर्थिक बाबतीत सुधारणा होईल.

**कुंभ** – स्वतःच्या योजनांमध्ये सकारात्मक बदल दिसतील. कुटुंबासोबत वेळ घालवण्याची संधी मिळेल. आरोग्य जपा.

**मीन** – नवीन व्यवसाय सुरू करण्याचा विचार करू शकता. फिटनेसवर लक्ष केंद्रित करा. मानसिक विश्रांती घ्या.

# आदिवासी बांधवांच्या उत्कर्षासाठी कटिबद्ध - मंत्री अशोक उईके

## आदिवासी समाजाच्या विविध समस्यांवर आढावा बैठक



मुंबई (विशाल कारंडे) : आदिवासी समाजांचा सांस्कृतिक वारसा, भाषा, कला आणि परंपरा जपणे आवश्यक आहे. यामुळे विविधता आणि सामाजिक समृद्धी टिकून राहते. आदिवासी समाजाच्या हक्कांचे संरक्षण आणि उत्कर्षासाठी शासन कटिबद्ध असल्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी सांगितले. आदिवासी समाजाच्या विविध समस्यांवर चर्चा करण्यासाठी विधानभवन येथे आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. मंत्री श्री. उईके म्हणाले, वनहक्क जमीन पट्ट्याचे कायदे वेळोवेळी बदलत गेले. वन हक्क दावे हा विषय महसूल, वन विभाग आणि ग्रामविकास विभागाशी संबंधित आहे. या तिन्ही विभागासोबत लवकरच बैठक घेण्यात येईल. मुख्यमंत्री महोदयांकडे झालेल्या शंभर दिवस उपक्रम बैठकीमध्ये आदिवासी समाजाचे अनेक प्रश्न सुटले पाहिजेत यासाठी आराखडा तयार करण्यात आला आहे. यामध्ये वन हक्क जमीन हा मुद्दा तात्काळ सोडविण्यासाठी आदिवासी विकास विभाग प्रयत्न करेल. राज्य जनजाती सल्लागार परिषदेची बैठक लवकरच घेण्यात येईल. आदिवासी समाजातील प्रमुख मुद्दे, जसे की शिक्षण, आरोग्य, जमीन हक्क, आर्थिक विकास आणि सांस्कृतिक संवर्धन यावर लक्ष केंद्रित केले जाणार असल्याचे मंत्री श्री.उईके यांनी यावेळी सांगितले. वन विभागातील प्रलंबित दावे,वन धन योजना, कातकरी समाजासाठी घरकुल, जाती प्रमाणपत्र, रेशन कार्ड, आधार कार्ड आणि अन्य महत्वाची कागदपत्रे, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मार्फत तयार करण्यात आलेल्या शबरी नॅचरल ब्रँड याबाबत चर्चा करण्यात आली . या बैठकीस आमदार सर्वश्री राजेश पाडवी, काशिराम पावरा, केवलराम काळे, राजू तोडसाम, दिलीप बोरसे, हरिश्चंद्र भोये, भीमराव केराम, मंजुळाताई गावित यांच्यासह वनवासी कल्याण आश्रमचे सदस्य उपस्थित होते.

# क्षत्रिय मराठा कदम परिवाराचे सातवे राज्यस्तरीय कुलसंमेलन यंदा खेडमधील जामगे गावात



खेड (सुचित शिंदे) - महाराष्ट्रातील प्राचीन कदम घराण्याचेसातवे भव्य राज्यस्तरीय कुलसंमेलन यावर्षी रत्नागिरी जिल्ह्यातील जामगे (खेड) येथे माजी पर्यावरण मंत्री रामदासभाई कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवार ८ फेब्रुवारी व रविवार ९ फेब्रुवारी यादिवशी आयोजित करण्यात आले आहे. प्राचीन सत्ताधीश कदंब राजवंशाचा इतिहास लाभलेल्या कदम कुटुंबीयांना स्वतःचे कुलाचार, परंपरा, वारसा याबद्दल माहिती व्हावी, नोकरी व्यवसायात एकमेकांना सहकार्य मिळावे तसेच घराण्यातील नामवंतांचा सन्मान करून त्यांना प्रोत्साहन देणे ही उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून क्षत्रिय मराठा कदम परिवार संस्थेने आजतागायत तुळजापूर, गिरवी ( फलटण ), गढीताम्हाणे ( सिंधुदुर्ग), गलांडवाडी (दौंड), धामदरी (नांदेड) आणि आंबेचिंचोली (पंढरपूर) याठिकाणी मोठ्या उत्साहात संपन्न झाली आहेत. यंदाचे सातवे राज्यस्तरीय वार्षिक कुलसंमेलन कोकणातील खेडजवळच्या जामगे या गावामध्ये ८ व ९ फेब्रुवारी रोजी होणार आहे. या कुलसंमेलनासाठी विद्यमान गृहराज्यमंत्री ना. योगेशदादा कदम यांचे मूळगावामध्ये महाराष्ट्रासह गोवा, मध्यप्रदेश, कर्नाटक , बडोदा या राज्यातूनही कदम बांधव उपस्थित राहणार आहेत. व्यवसाय तसेच विविध कारणांमुळे वेगवेगळ्या गावाशहरांमध्ये वास्तव्यास असलेल्या कदम घराण्यातील व्यक्ति कुलसंमेलनानिमित्त एकत्र येणार असून, घराण्याचा जाज्वल्य वारसा जपण्याचा मानस मेळाव्यातून केला जाणार आहे. कुलसंमेलनाच्या पहिल्या दिवशी म्हणजेच शनिवारी ८ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी सात वाजता कुलदेवता श्रीतुळजाभवानीच्या जागर गोंधळाने कार्यक्रमाची सुरूवात होणार आहे.

SPORT

# D Gukesh becomes new India No. 1, overtakes Arjun Erigaisi; R Praggnanandhaa pips Viswanathan Anand to third position



NEW DELHI : It wasn't an easy game for D Gukesh, but the reigning world chess champion came out on top in a nerve-wracking 72-move battle against Vincent Keymer on Wednesday. It also turned out to be the longest game of Round 5 in the Masters section of the ongoing Tata Steel Chess tournament in Wijk aan Zee, on Wednesday. The result also sees Gukesh become the new India No. 1, overtaking Arjun Erigaisi in the live ratings, which are updated real-time. It is worth noting that Keymer was part of Gukesh's team in Singapore during the World Chess Championship in December last year. On Wednesday, Gukesh was once again out in a grey hoodie, and played with white pieces. He began with some errors, giving the German early control. But soon Gukesh's reading of the game overcame Keymer's strategy of trying to tire the Indian out, and the German resigned.

Gukesh has gained seven Elo points to get his live rating up to 2784, and Erigaisi, who was India no. 1 before this tournament, has lost 21.5 points and is at 2779. Before this event, Erigaisi was in the 2800-club, but has been in poor form lately. In Wijk aan Zee, he has lost three games and has drawn twice. He is positioned at joint-bottom with Leon Luke Mendonca. Meanwhile, Gukesh is currently unbeaten in the tournament, bagging two wins and three draws, He drew against Vladimir Fedoseev and Alexey Sarana, but got wins vs Anish Giri and Vincent Keymer.The live ratings are expected to change, and if Erigaisi makes a comeback, he could take his position back from Gukesh again. There are eight more swiss rounds to go, and potential playoffs.

Despite not participating in the tournament, Magnus Carlsen still leads in the live ratings with 2832.5, and is followed by American GM Hikaru Nakamura (2802) and Fabiano Caruana (2798) in second and third respectively. Meanwhile, Gukesh is now fourth and Erigaisi is fifth in the leaderboard. Meanwhile, R Praggnanandhaa (2753.9) has climbed three positions higher and is 10th, with Viswanathan Anand (2750) is 11th.

# Abhishek Sharma, spinners ruin Bazball's white-ball induction



NEW DELHI : Indian conditions are proving to be kryptonite for Bazball. A year after the much-hyped aggressive approach of England's Test team faltered in India, the Brendon McCullum era in white-ball cricket got off to a shaky start. McCullum, in his first assignment as T20I coach, promised entertainment, but it was the Indian bowlers and batters who electrified the Kolkata crowd in the T20I series opener at Eden Gardens. England struggled in their first trial by spin in the T20I series. Despite a brisk fifty from captain Jos Buttler, the visitors were bundled out for 132. Contrary to expectations, the clash between two batting powerhouses turned into a low-scoring affair, dominated by the Men in Blue. Abhishek Sharma smashed a 20-ball fifty, helping India comfortably chase down the target and hand England a deflating seven-wicket defeat on Wednesday, January 22. India chased down 133 in just 12.5 overs as India dominated in all three departments to take a 1-0 lead in the five-match series. Abhishek was at his dominant best, hitting eight sixes in the chase as England bowlers were sent for a leather hunt in Kolkata. On the other hand, it was a morale-boosting win for India and Gautam Gambhir after a tumultuous tour of Australia where the Asian giants dropped the Border-Gavaskar Trophy. After winning the toss, India's call to include Mohammed Shami in the XI and delay his much-awaited international return came as a surprise. In the lead-up to the game, there was a lot of chatter about the late evening dew in Kolkata. In fact, India trained with wet balls on the eve of the series opener to get used to the dewy conditions. However, India's decision to field three spinners after winning the toss and opting to field proved to be the right call. The performances of Varun Chakravarthy, Ravi Bishnoi and vice-captain Axar Patel ensured England never got the scoreboard moving at a brisk pace after Arshdeep Singh tore into their top-order.



## Australian Open loss to Jannik Sinner feels like a slap, says dejected Alex de Minaur

Australia - Australian tennis star Alex de Minaur said his quarter-final loss to Jannik Sinner at the Australian Open 2025 felt like a slap across the face. De Minaur looked in the form of his life and was touted as Australia's best hope to end a long Grand Slam drought. However, Jannik Sinner had other plans as the defending champion handed De Minaur a decisive 6-3, 6-2, 6-1 loss in just an hour and 48 minutes. Sinner's win meant that Australia's wait for a homegrown men's singles Grand Slam champion continued.

The loss marked De Minaur's 10th consecutive defeat against Sinner, overshadowing what had otherwise been a strong campaign for the world number eight at Melbourne Park.

"The positives, how I handled everything ... the fact that I came in this year as a top 10 with a lot of expectations, a lot of pressure. The whole country wanted me to do well. I wanted to do well here," De Minaur told reporters.

"I would have loved to do more today, but this is what happens sometimes in tennis. The negative is that after playing some great tennis on home soil and gaining so much, you feel like you've just been slapped across the face, to be honest, to finish off like that."

# Abhishek Sharma gets a cheeky tap from Yuvraj Singh after smashing 8 sixes in 20-ball fifty against England

NEW DELHI :Yuvraj Singh's influence on Abhishek Sharma is unmissable. The swagger, the effortlessness, the symphonic flow of the bat, a touch of nonchalance and a whole lot of class oozing through the shots. All of that and much more was on display during the India vs England 1st T20I at the Eden Gardens in Kolkata. Abhishek Sharma, Yuvraj's disciple, blazed to a 20-ball fifty and hit eight sixes in a breathtaking knock of 79 off just 34 balls to help India take a 1-0 lead in the five-match series. It was because of Abhishek's onslaught that India were able to gallop their way to the 133-run target in just 12.5 overs.

What was Abhishek's reward after the match? A standing ovation from a capacity Eden Gardens aside, praise from his mentor Yuvraj, albeit in a cheeky way.

Among 13 boundaries (eight sixes and five fours) that Abhishek hit on Wednesday, the ones hit straight back past the bowler impressed Yuvraj the most. Two of Abhishesk's sixes and one four came in the 'V'. Yuvraj took note



of that praised the all-rounder, who is extremely strong square of the wicket due to his flat batted shots, in his own style.

"Good start to the series boys ! great tone set by our bowlers and well played sir !@IamAbhiSharma4 top knock '!! I'm impressed you hit 2 boundaries down the ground as well," Yuvraj wrote on X.

The Yuvraj connection in Abhishek's demolition job

En route, Abhishek joined Yuvraj in the list of India batters to get the fastest fifty against England in T20Is. The veteran India all-rounder had smashed a half-century in just 12 balls in that famous 2007 World T20 game in Durban, where he scored 6 sixes in an over against Stuart Broad. The youngster reached the mark on Wednesday in 20 balls.

86.07 per cent (68) of Abhishek's total runs in the first T20I against England came in boundaries. Only former India T20I skipper Rohit Sharma had a higher share of boundaries in a knock of at least 75 runs - 91.53 per cent (108/118) against Sri Lanka in Indore in 2017.

After the match, Abhishek thanked captain Suryakumar Yadav and head coach Gautam Gambhir for instilling confidence in him.

"I just wanted to express myself. A special mention to the captain and coach. They have given us a lot of freedom. The way they talk to youngsters, it's tremendous. I haven't seen a team environment like this. When it's coming from the captain and coach, to play freely, it's special," Abhishek said.

Earlier in the day, India's bowlers Arshdeep Singh (2/17) and Varun Chakaravarthy (3/22) restricted England to a below-par 132 in 20 overs. Apart from captain Jos Buttler (68 off 44) all other England batters struggled against India's bowlers.

India and England will next travel to Chennai for the second T20I set to take place on Saturday.



## Carlos Alcaraz reacts to his controversial QF match against Novak Djokovic

NEW DELHI :The Australian Open 2025 is in full swing, showcasing an exhilarating battle among tennis titans like Novak Djokovic, Iga Swiatek, Jannik Sinner, and Aryna Sabalenka, as they strive for the first Grand Slam title of the year. Amid the electric atmosphere, controversies have also emerged, especially after Carlos Alcaraz's quarterfinal loss to Djokovic on Tuesday. The Spaniard started strong, securing the first set 6-4, but succumbed in the following three sets (4-6, 3-6, 4-6). The turning point of the match involved Djokovic's apparent injury after the first set, raising eyebrows about the legitimacy of his physical ailment. In a recent development on the controversy, the 21-year-old Alcaraz has shared his reaction to his match against Nole, and it is something fans wouldn't want to miss. Despite the disappointment of losing, Carlos Alcaraz chose to focus on the positives from his encounter with Novak Djokovic. During the post-match press conference, Alcaraz expressed gratitude for Djokovic's compliments, calling the match one of the best of his career in the Australian Open. "Yeah, I mean, for me it's great hearing those words from someone who played historic matches, historic things. "I'm leaving here Australia with the head up. I'm really happy about hearing those words from Novak, " Alcaraz remarked.

# आदिवासींच्या प्रश्नांवर राजकारणापलीकडे विचार व्हावा - राज्यपाल राधाकृष्णन

## राज्यपालांच्या हस्ते राज्यातील नवनियुक्त आदिवासी आमदारांचा सत्कार



● मुंबई, विशाल कारंडे :

आदिवासींच्या प्रश्नांवर राजकारणापलीकडे विचार झाला पाहिजे. विकसित भारत म्हणजे सर्वसमावेशक विकास. विकसित भारताचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्व आदिवासी बांधवांचे जीवनमान उंचावले पाहिजे. यासाठी सर्व लोकनियुक्त प्रतिनिधींनी प्रयत्न केले पाहिजेत, असे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज येथे केले.

राज्यातील नवनियुक्त आदिवासी खासदार व आमदारांचा सत्कार राज्यपाल राधाकृष्णन यांच्या हस्ते बुधवारी (दि. २२) सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते. वनवासी कल्याण आश्रम, महाराष्ट्र प्रांतांतर्फे नवनियुक्त आदिवासी खासदार व आमदारांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

राष्ट्रपती भवन येथे झालेल्या राज्यपालांच्या परिषदेत आपण आदिवासी विकासविषयक उपसमितीचे अध्यक्ष होतो असे सांगून आदिवासी विकासाकडे विशेष लक्ष्य देण्यासाठी राजभवन येथील आदिवासी कक्ष पुनरुज्जीवित करण्यात आला असल्याचे राज्यपालांनी सांगितले.

राज्यात आदर्श आदिवासी गाव विकसित केले जात असून त्याठिकाणी निवासी संकुल, शाळा, आरोग्यकेंद्र, समाजमंदिर, शॉपिंग कॉम्प्लेक्स आदी सुविधा असतील. याशिवाय नाशिक येथे स्वतंत्र आदिवासी विद्यापीठ निर्माण केले जाणार असून तेथे आयआयटी दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय व एम्सच्या धर्तीवर वैद्यकीय महाविद्यालय उभारले जाईल. या विद्यापीठातील ८० टक्के जागा केवळ आदिवासी विद्यार्थ्यांसाठी राखीव राहतील. आपण लवकरच राज्यातील आदिवासी गावांना भेट देणार असून अति आदिम समाजाच्या विकासासाठी विशेष प्रयत्न केले जातील, असे राज्यपाल राधाकृष्णन यांनी सांगितले.

यावेळी आदिवासी विकास मंत्री डॉ अशोक उईके यांनी राज्यातील प्रत्येक विद्यापीठात आदिवासी मुला-मुलींसाठी वसतिगृह सुरु करण्यासाठी जागा देण्यात यावी, अशी मागणी केली. वनहक्क कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी तसेच कातकरी समाजाच्या विकासासाठी विशेष प्रयत्न केले जावे, अशी अपेक्षा डॉ. उईके यांनी व्यक्त केली.

यावेळी वनवासी कल्याण आश्रमाचे अध्यक्ष सत्येंद्र सिंह यांनी लोकशाही, पंचायत, स्त्री-पुरुष समानता, पर्यावरण रक्षण याबाबतीत आदिवासी जीवनशैली समाजाला मार्गदर्शक असल्याचे सांगितले. आदिवासी आमदारांनी आपल्या समाजाच्या समस्या पक्षाच्या व्यासपीठावर तसेच विधानमंडळात जोरकसपणे मांडाव्या, असे त्यांनी सांगितले. आमदारांनी निवडून आलेल्या आपल्या भागात पाच वर्षे विकास पुरुष होऊन कार्य करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाला अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, आश्रमाच्या कोकण प्रांताचे अध्यक्ष विष्णू सुरूम, ऑलिम्पिक स्पर्धेतील धावपटू कविता राऊत तुंगार तसेच नवनियुक्त आदिवासी आमदार उपस्थित होते. यावेळी राज्यातील १७ आदिवासी आमदारांचा सत्कार करण्यात आला.

राज्यपालांच्या हस्ते सर्व आमदार राजेश पाडवी, काशीराम पावरा, केवलराम काळे, राजू तोडसाम, दिलीप बोरसे, हरिश्चंद्र भोये, आमश्या पाडवी, मंजुळाताई गावित, चंद्रकांत सोनावणे, राजेंद्र गावित, नितीन पवार, दौलत दरोडा, डॉ किरण लहामटे, शांताराम मोरे, भीमराव केराम, नरहरी झिरवाळ व डॉ अशोक उईके यांचा सत्कार करण्यात आला.

# राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या ठाणे, पालघर विभागीय अध्यक्षपदी रंगनाथ तांगडी यांची निवड

● ठाणे, सुचित शिंदे :

राष्ट्रीय ओबीसी महासंघ या देशपातलीवर काम करणाऱ्या संघटनेच्या ठाणे, पालघर विभागीय अध्यक्ष पदावर रंगनाथ तांगडी यांची नुकताच नियुक्ती करण्यात आली आहे रंगनाथ तांगडी हे गेली तीस वर्ष पत्रकारिता क्षेत्रामध्ये कार्यरत असून विविध सामाजिक संघटनांमध्ये देखील चांगल्या प्रकारे कार्य केले आहे संभाजी ब्रिगेड चे ठाणे जिल्हा अध्यक्ष, बालशास्त्री जांभेकर मराठी पत्रकार संघाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष अशा पदांवर त्यांनी कार्य केले आहे तर नुकताच त्यांची व्हॉइस ऑफ मीडिया या पत्रकार संघटनेच्या कोकण विभागीय सचिव पदावर निवड करण्यात आली आहे पत्रकारिता क्षेत्रात डॅशिंग व अभ्यासू प त्रकार म्हणून त्यांची ओळख आहे प्रशासकीय कामकाजाचे अभ्यास म्हणून त्यांना ओळखले जाते रंगनाथ तांगडी यांना सामाजिक कार्याची आवड आहे गेल्या काही वर्षांपासून विविध समाज घटक एकत्र येऊन आपल्या न्याय हक्कासाठी लढताना दिसत आहेत परंतु देशांमध्ये मोठ्या संख्येने



असलेला ओबीसी समाज त्यामानाने एकत्र होत नाही हे खंत मनात धरून ओबीसी समाजाकरता काही कार्य करावी अशी इच्छा रंगनाथ तांगडी यांनी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे प्रदेश अध्यक्ष प्रकाश जी भांगरत यांच्याकडे व्यक्त केली होती त्याची दखल घेऊन आणि रंगनाथ तांगडी यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन प्रकाश भांगरत यांनी रंगनाथ तांगडी यांची राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या ठाणे पालघर विभागीय अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे भविष्यात त्यांच्याकडून चांगले सामाजिक कार्य घडेल अशी अपेक्षा देखील त्यांनी व्यक्त केली आहे.

# साई मंदिराच्या सुरक्षा पथकात नव्या श्वानाची एन्ट्री

● शिर्डी, अभिजीत येरल्लू :

शिर्डी येथील साईबाबा मंदिराच्या सुरक्षा पथकात आता 'सिंबा' नावाच्या नव्या श्वानाची एन्ट्री झाली आहे. 'वर्धन' श्वानानं दहा वर्ष सेवा दिल्यानंतर तीन महिन्याचा 'सिंबा' आता बॉम्ब शोधक आणि नाशक पथकात दाखल झालाय. सिंबाची बीडीडीएस पथकाकडून ट्रेनिंग सुरू असून लवकरच तो साई मंदिराच्या सुरक्षेसाठी तैनात होणार आहे. शिर्डी साईबाबा मंदिर हे जागतिक दर्जाचं तीर्थक्षेत्र असल्यानं येथे दररोज लाखो भाविक साईबाबांच्या समाधीच्या दर्शनासाठी येतात. याचबरोबर व्हीव्हीआयपी देखील मोठ्या प्रमाणात इथं येत असतात. साई मंदिर आणि परिसरात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाच्या वतीनं साईबाबा मंदिरासाठी स्पेशल बीडीडीएस पथक तैनात करण्यात आले आहे. साईबाबांच्या मंदिरात होणाऱ्या पहाटेच्या काकड आरती, मध्यान्ह आरती आणि धुपाआरती तसंच रात्रीच्या शेजाआरतीच्या अगोदर साईंच्या समाधी मंदिरासह परिसरातील सर्वच मंदिरात बीडीडीएस पथकाकडून तपासणी केली जाते. बीडीडीएस पथकात पूर्वी 'वर्धन' नावाचा श्वान कार्यरत होता. मात्र, तो



सेवानिवृत्त झाल्यानंतर त्याच्या जागी आता सिंबा दाखल झालाय. सिंबाचं सध्या साई मंदिर परिसरात प्राथमिक प्रशिक्षण सुरू आहे. लवकरच तो पुणे सीआयडी येथून ट्रेन होऊन साई मंदिराच्या सुरक्षेसाठी तैनात होणार असल्याची माहिती, साई मंदिर पोलीस निरीक्षक सतीष घोटेकर यांनी दिली. पुढं ते म्हणाले, गेल्या दहा वर्षांपासून साई मंदिरात वर्धन श्वानानं सेवा दिल्यानंतर आज तो सेवानिवृत्त झाल्यानं बीडीडीएस पथकातील अनेकांना अश्रू अनावर झाले होते.

# वाढत्या नागरीकरणामुळे पाण्याचा पुनर्वापर करण्यावर भर द्यावा लागणार

■ ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांचे प्रतिपादन

■ ठाणे महापालिका क्षेत्रातील प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर आराखड्याचे प्रकाशन

● ठाणे, रोहित जैसवार :

शाश्वत नागरी विकासासाठी पाण्याचा पुनर्वापर करण्याचे नियोजन करून जल व्यवस्थापनाच्या क्षेत्रात ठाणे महानगरपालिकेने अतिशय महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. या आराखड्याची अंमलबजावणी कालबद्ध रीतीने करण्यात येणार आहे. वाढत्या नागरीकरणामुळे पाण्याचा पुनर्वापर करण्यावर भर द्यावा लागणार असल्याचे प्रतिपादन ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.

सध्या ठाणे महापालिका क्षेत्रात दररोज २४१ दशलक्षलीटर सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. त्यापैकी केवळ ५ टक्के पाण्याचा पुनर्वापर होतो. २०३५पर्यंत हा वापर किमान १६ टक्क्यांपर्यंत



वाढवण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे. तोवर ४९० दशलक्षलीटर सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते पुनर्वापर योग्य करण्याची क्षमता निर्माण होईल. या आराखड्यातून प्रक्रिया क्षमता वाढवणे, जास्तीत जास्त पाण्याचा पुनर्वापर करणे, उद्यान, शौचालये, उद्योग, बांधकाम यासाठी या पाण्याचा वापर वाढवून पिण्याच्या पाण्यावरील अवलंबित्व कमी करण्याचे नियोजन असल्याचे आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

उष्णता कृती आराखडा, नागरी पूर व्यवस्थापन नियोजन, हवा गुणवत्ता व्यवस्थापन या तीन आराखड्यानंतर आता पाण्याचा पुनर्वापर करण्यासाठी आराखडा तयार करण्यात आला आहे. ठाणे महानगरपालिकेसाठी कौन्सिल ऑन एनर्जी एन्व्हायरमेंट अँड वॉटर (सी ई ई डब्ल्यू) यांनी महापालिकेच्या सर्व विभागांशी संवाद साधून, क्षेत्र भेटी देऊन हा आराखडा तयार केला आहे. त्याचे प्रकाशन गुरूवारी महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, एडीटीपी संग्राम कानडे, उपायुक्त मनोहर बोडके, टीएमटीचे व्यवस्थापक भालचंद्र बेहरे, मुख्य अग्निशमन अधिकारी गिरीश झळके, उप नगर अभियंता विकास ढोले, विनोद पवार, गुणवंत झांबरे, मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, उद्यान अधिकारी केदार पाटील, 'सीईईडब्ल्यू'चे विश्वास चितळे, नितीन बस्सी, साबिया गुप्ता, कार्तिकेय चतुर्वेदी, आयुषी कश्यप आदी उपस्थित होते.

सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते पाणी पिण्याव्यतिरिक्त इतर उपयोजनांकरता वापरण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने लक्ष्ये निर्धारित केली आहेत. जलवाहिन्यांच्या अमृत योजनेसाठीही या निकषांची पूर्तता करणे आवश्यक आहे. त्यामुळे 'सीईईडब्ल्यू'ने केलेला हा आराखडा ठाण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. देशात अनेक ठिकाणी पाण्याचा पुनर्वापर योजना असल्या तरी याप्रमाणे त्याचा नियोजनबद्ध आराखडा तयार करणारी पहिली महापालिका ठाणे असेल, असेही आयुक्त राव यांनी सांगितले. ठाण्यातील वाढती लोकसंख्या, नागरीकरण यामुळे पाण्याच्या जास्तीत जास्त पुनर्वापराचा विचार महापालिकेस करावाच लागेल, असेही राव याप्रसंगी म्हणाले.

'सीईईडब्ल्यू' संस्थेने गेल्या सात महिन्यात महापालिकेच्या विविध विभागांशी संवाद साधून हा आराखडा तयार केला आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या सांडपाणी प्रक्रिया केंद्रांची पाहणी, पाण्याच्या पुनर्वापरासाठी उपलब्ध असलेल्या संधी यांचा अभ्यास करून हा आराखडा तयार करण्यात आल्याची माहिती मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यांनी दिली.

उद्यान, अग्निशमन सेवा, बस डेपो, रस्ते धुणे, बांधकाम, शौचालय येथे प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर शक्य आहे. तसेच, भूजल वाढवण्यासाठीही या पाण्याचा उपयोग होऊ शकतो.

# डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथील स्मारक जागतिक दर्जाचे करावे - सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट

■ सामाजिक न्याय मंत्री यांनी केली इंदू मिल येथील स्मारकाची पाहणी ■

● मुंबई, राकेश गायकवाड :

**संपूर्ण जगासाठी आकर्षण आणि प्रेरणादायी ठरणारे, दादर येथील इंदू मिल येथे उभारण्यात येत असलेले भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक जागतिक दर्जाचे करावे. एप्रिल २०२६ पर्यंत या स्मारकाचे अनावरण करण्याचा मानस असून स्मारकाचे काम दर्जेदार करावे, अशा सूचना सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिल्या. तसेच स्मारकासाठी लागणारा निधी वेळोवेळी उपलब्ध करून दिला जात असल्याचेही मंत्री शिरसाट यांनी सांगितले. दादर इंदू मिल येथील स्मारकाच्या कामाची आज मंत्री शिरसाट यांनी पाहणी केली. त्यावेळी त्यांनी या सूचना दिल्या.**



यावेळी सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, सामाजिक न्याय विभागाचे आयुक्त ओम प्रकाश बकोरिया, अतिरिक्त महानगर आयुक्त विक्रम कुमार, सहायक आयुक्त प्रसाद खैरनार तसेच विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी स्मारकामध्ये उभारण्यात येत असलेल्या सोयी-सुविधा, स्मारकाचे तीव्र वादळापासून संरक्षण होण्यासाठी केलेल्या उपाय योजनांबद्दल त्यांनी माहिती जाणून घेतली.

सध्या येथील इमारतीचे काम जवळपास पूर्ण झाले असून स्मारकाचे काम प्रगतीपथावर आहे. या स्मारकामध्ये शंभर फूट उंच पीठावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कांस्य धातूने आच्छादित ३५० फुट उंचीचा पुतळा स्थापित करण्यात येणार आहे. या स्मारकाचा संपूर्ण परिसर हरित असेल, या ठिकाणी एक हजार आसन क्षमता असलेले सभागृह, संशोधन केंद्र, ध्यानधारणा केंद्र, ग्रंथालय व भूमिगत वाहनतळ असणार आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

# आरोपी शरिफुलचा बांगलादेशातील चालक परवाना पोलिसांच्या हाती

● मुंबई, विशाल पाटील :

अभिनेता सैफ अली खानवर हल्ला करणारा आरोपी मोहम्मद शरिफुल इस्लाम शहजाद उर्फ विजय दास (३०) याचा बांगलादेशचा नागरिक असल्याचे ओळखपत्र व चालक परवाना पोलिसांच्या हाती लागला आहे. आरोपी बांगलादेशी घुसखोर असल्याचा महत्त्वाचा पुरावाच पोलिसांच्या हाती लागला आहे. सैफवर हल्ला करणार आरोपी शरिफुल ऊर्फ दास हा बांगला देशी घुसखोर असून त्याने मे महिन्यात बांगलादेश सीमेवरील डावकी नदी ओलांडून भारतात प्रवेश केला होता. मेघालयात प्रवेश केल्यानंतर त्याने एका दलालाला दहा हजार दिले. त्या दलालाने त्याला आसामपर्यंत आणले आणि त्याला एक सिम कार्डही पुरवले. त्याच दलालाने त्याला कोलकात्याला जाण्यासाठी बसमध्ये बसवले. कोलकात्यात तीन दिवस राहिल्यानंतर आरोपीने मुंबईत येण्यासाठी रेल्वे पकडली. मुंबईत त्याने पुढील तीन दिवस इकडे तिकडे भटकून काढले. त्यानंतर त्याची ओळख



जितेंद्र पांडे यांच्याशी झाली. पांडे याने त्याला वरळीतील एका पबमध्ये स्वच्छता कर्मचारी म्हणून नोकरी लावली. मात्र गेल्यावर्षी ऑगस्ट महिन्यात काही दिवसातच चोरीच्या आरोपाखाली त्याला नोकरीवरून काढून टाकण्यात आले.

नोकरी गमावल्यानंतर शरिफुलने चोऱ्या करण्यास सुरूवात केली. शरिफ ३१ डिसेंबरपासून खार आणि वांद्रे सारख्या उच्चभ्रू परिसरात फिरून आपले लक्ष्य शोधत होता. घरफोडी करण्यासाठी त्याने स्क्रू-ड्रायव्हर, हातोडा आणि हॅक्सॉ ब्लेड घेतले. ठाण्याच्या रेस्टॉरंटमधून चोरलेला चाकूही शरिफुल जवळ बाळगत होता, असे चौकशीत उघड झाले आहे.